# जेईई अॅडव्हान्स्ड परीक्षेचा निकाल जाहीर; शुभम कुमार टॉपर



**नवी दिल्ली :** इंजिनिअरिंगसाठी घेतली जाणारी देशातील प्रतिष्ठित प्रवेश पूर्व परीक्षा 'जेईई अॅडव्हान्स्ड'चा निकाल सोमवारी (दि.१) जाहीर करण्यात आला. या परीक्षेत आयआयटी दिल्ली झोनच्या शुभम कुमारने ३६०पैकी ३३० गुण मिळवून 'कॉमन रँक लिस्ट'मध्ये अव्वल स्थान पटकावले आहे, तर आयआयटी दिल्ली झोनचीच आरोही देशपांडे ही ७७व्या ऑल इंडिया रँकसह सर्वात जास्त गुण मिळवणारी विद्यार्थिनी ठरली आहे. तिने ३६० पैकी २८० गुण मिळवले. जॉइंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन २०२६च्या निकालात ५६ हजारांपेक्षा जास्त उमेदवारांनी यश मिळवले आहे. देशातील अत्यंत कठीण परीक्षांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या प्रवेश परीक्षेत एकूण ५६,८८० उमेदवार उत्तीर्ण झाले, ज्यामध्ये १०,१०७ विद्यार्थिनींचा समावेश आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३१४

www.ramprahar.com

◆ मंगळवार, २ जून २०२६ ◆ पाने २४ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


अमृत महोत्सवानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अभीष्टचिंतन / ३

आज नवीन पनवेलमध्ये कॅन्सर तपासणी व आरोग्य शिबिर / ४

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर अपघात; दोघांचा मृत्यू, तिघे जखमी / ५









माजी खासदार, लोकनेते
श्री. आदरणीय
रामशेठ ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!
02 जून
75 अमृत महोत्सवी वर्ष
अगणित माणसे
या जगात
जन्मास येतात,
पण तुमच्यासारखे
यशस्वी व्यक्तिमत्त्व
एखादंच
जन्मास येतं...
शुभेच्छुक
CHAIRMAN
H. G. PATIL
MANOJ PATIL
CHANDAN PATIL
MANOJ
InfraWork Pvt. Ltd.
MANOJ
ENTERPRISES
Civil Contractor & Concrete Plant Owner
Off :- 21/22, Second floor, Near Sukham Hospital, Jasdhanwala Office Complex,
Panvel. 9870022236/02227468650. Email : manojent.2000@gmail.com


कुशल रणनीतीकार
आदर्श नेतृत्व
माजी खासदार
लोकनेते
मा.श्री.
रामशेठ ठाकूर साहेब
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
श्री.प्रितम जनार्दन म्हात्रे
मा.विरोधीपक्ष नेता, पनवेल महानगरपालिका
सौ.ममता प्रितम म्हात्रे
सभापती.महिला-बालकल्याण समिती, प.म.पा.

रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३१४
www.ramprahar.com
◆ मंगळवार, २ जून २०२६ ◆ पाने २४ ◆ किंमत ₹ २

अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अभीष्टचिंतन



(अधिक छायाचित्रे पान ११ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मल्हार नेटवर्क प्रा. लि.च्या वतीने अभीष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन सोमवारी (दि.१) करण्यात आले होते. दैनिक रामप्रहरच्या कार्यालयात हा सोहळा अत्यंत उत्साही आणि भारावलेल्या वातावरणात झाला.

या सोहळ्याला पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम, नगरसेवक सुमित झुंजारराव, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, मल्हार नेटवर्क प्रा. लि.चे संचालक स्वप्नील ठाकूर, दै. रामप्रहरचे मुख्य संपादक देवदास मटाले, व्यवस्थापक दादाराम मिसाळ, वृत्त संपादक समाधान पाटील, उपसंपादक नितीन देशमुख, सुधाकर जगताप, मुख्य आर्टिस्ट अरुण चवरकर, शशिकांत बारसिंग, सुबोध ठाकूर, लेखापाल उद्धव घरत, वितरण विभागाचे महेश काळे, करण वाहुळकर, मल्हार चॅनेलचे संपादक नितीन कोळी, श्रीगणेश धुमाळ, विशाल पाटील, अविनाश डोयरिया, योगेश पाटील, विकास म्हात्रे, अक्षय शार्दूल, प्रफुल्ल कांबळे, पत्रकार प्रकाश सोनवडेकर, हरिभाऊ देशमुख यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी संपादित केलेल्या 'रामशेठ नाबाद ७५' या पुस्तकाचे प्रकाशन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

## आनंदवार्ता! मान्सून केरळमध्ये दाखल

**नवी दिल्ली :** मान्सूनसंदर्भात सुखावणारी एक बातमी समोर आली आहे. केरळमध्ये मान्सून दाखल झाल्याची घोषणा भारतीय हवामान विभागाने सोमवारी (दि.१) केली. हळूहळू तो वरच्या भागात सरकेल.

दरम्यान, सध्या महाराष्ट्रात काही ठिकाणी पावसाच्या सरी पडत आहेत, पण किमान १० जूनपर्यंत राज्यातील बहुतांश भागात मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही, असे प्रादेशिक हवामान विभागाने म्हटले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी दमदार पाऊस व अधिकृत माहिती मिळेपर्यंत पेरण्या न करण्याच्या सूचना कृषी विभागाकडून देण्यात आल्या आहेत.

## ई-बसेससाठी चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** 'विकसित महाराष्ट्र अंतर्गत'एसटी महामंडळामध्ये सन २०२९पर्यंत ५० टक्के, २०३५पर्यंत ८० टक्के; तर २०४७पर्यंत एसटीचा १०० टक्के ताफा ई-बसेसमध्ये रूपांतरित करायचा आहे. या अनुषंगाने बसेससाठी आवश्यक असलेले चार्जिंग स्टेशन उभारण्याच्या कामाला गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. वर्षा येथील निवासस्थानी महाराष्ट्र राज्यमार्ग परिवहन महामंडळाच्या ई-बसेससंदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते.



**महाड :** राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले यांना वाढदिवसानिमित्त भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांच्या समवेत प्रदेश सरचिटणीस आमदार निरंजन डावखरे, रायगड जि.प.चे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, सभापती वैकुंठ पाटील, पनवेलचे महापौर नितीन पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आदी उपस्थित होते.







## संपादकीय

# अमृताचा घनु

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या पंच्याहत्तरीच्या निमित्ताने त्यांच्या अमृतमहोत्सवी वाटचालीचे अवलोकन करणे हा त्यांना जवळून-दुरून जाणणाऱ्या सर्वांसाठीच एक प्रेरणादायी अनुभव आहे. स्वतः रामशेठ यांनी वयाचे ओझे कधीच वाटून घेतलेले नाही. त्यांच्यासारख्या उत्तुंग कर्तृत्वाच्या व्यक्तीसाठी खरोखरीच वय ही निव्वळ एक संख्याच असावी.

**लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा जीवनविषयक दृष्टिकोन हाच त्यांच्या ऊर्जेचा अखंड स्रोत म्हणावा लागेल. त्यांचा कामाचा झपाटा, सूक्ष्म निरीक्षणशक्ती व अचूक निर्णयक्षमता कायमच त्यांच्या अवतीभवतीच्या सगळ्यांना प्रेरित करत आलेली आहे. आपण जे काही काम करतो आहोत ते दीर्घ काळ टिकून राहिले पाहिजे याबाबतीत ते अतिशय दक्ष असतात. स्वाभाविकपणे ज्या उपक्रमात त्यांचा सहभाग असेल, तिथे मग दर्जाच्या बाबतीत कुठलीच तडजोड कदापिही संभवत नाही. हातून जे काही साकारेल, ते उच्च प्रतीचेच घडले पाहिजे याविषयी ते कमालीचे आग्रही असतात. स्वकर्तृत्वाने भरभरून कमवायचे व 'इदं न मम' अशा निःस्वार्थ वृत्तीने तितक्याच सहजपणे ते गरजूंमध्ये वाटूनही टाकायचे अशी आध्यात्मिक वृत्ती त्यांनी आयुष्यभर जोपासली. म्हणूनच रायगड जिल्ह्यातील घराघरात रामशेठ यांचे नाव कित्येक वर्षांपासून अत्यंत जिव्हाळ्याचे ठरले आहे. निव्वळ रायगड जिल्ह्यातच नव्हे तर, उद्यमशीलता, समाजकारण, राजकारण आणि शैक्षणिक क्षेत्रातील भरीव कामगिरीमुळे महाराष्ट्रभरात व राष्ट्रीय पातळीवरही आज जाणकारांकडून रामशेठ ठाकूर यांचे नाव आदराने घेतले जाते. तळागाळातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणारे म्हणून जशी त्यांची ओळख आहे, तसाच जातपात विचारात न घेता अडचणीतील कुणालाही तत्परतेने मदतीचा हात देणारा लोकनेता हा लौकिकही त्यांनी सहज कमावला आहे. शिक्षणाच्या साह्याने स्वतःच्या आयुष्याला आकार देताना, कर्मवीर भाऊराव पाटील आणि रयत शिक्षण संस्थेकडून मिळालेला समाजाचे ऋण फेडण्याचा संस्कार त्यांनी आयुष्यभर जोपासला आहे. लहानपणीच्या हलाखीच्या परिस्थितीतून ते आज ज्या उंचीवर पोहोचले आहेत तेवढ्यापुरते त्यांचे मोठेपण कधीच मर्यादित राहिले नाही. आर्थिक अडचणींवर मात करून पुढे यशस्वी वाटचाल करणारे अनेक कर्तृत्ववान अवतीभवती दिसतात. रामशेठ यांच्या लौकिक कर्तृत्वाला पुढे नेतृत्वाची आणि दातृत्वाचीही झळाळी प्राप्त झाली. व्यवसायात मोठे यश प्राप्त केल्यानंतरही ते आपले मूळ कदापि विसरले नाहीत. स्वतःची परिस्थिती बेताची असतानाही आपले आईवडील आसपासच्या गरजूंना कायम मदतीचा आधार देत. हा संस्कार त्यांच्या मनात खोल रुजला होता. त्यामुळेच आपल्याला भरभरून मिळाले आहे, आपणही दोन्ही हातांनी भरभरून देत राहिले पाहिजे ही भावना त्यांनी बाळगली. त्यांच्या दातृत्वाचा यज्ञ म्हणूनच अव्याहत सुरू राहिला आहे. वैयक्तिक वाटचालीत शिक्षकी पेशाकडून ते उद्यमशीलतेकडे वळले, पण शिक्षणाविषयीचा अपार आदर कधीच ढळला नाही. त्यातूनच संपूर्ण रायगड जिल्ह्यात त्यांच्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची अनेक विद्यालये व महाविद्यालये साकारली. आपल्याला घडविणाऱ्या रयत शिक्षण संस्थेकरिता साताऱ्यात मोठे भवन उभारून देणे, मोखाड्यासारख्या दुर्गम आदिवासी भागात रयत शिक्षण संस्थेचे मोठे शैक्षणिक संकुल उभारणे यांसारखी कामे त्यांनी तळागाळातील विद्यार्थ्यांचे आयुष्य घडविण्याच्या उदात्त हेतूने सहजपणे केली. राजकीय क्षेत्रातील कामगिरीसोबत कोट्यवधींची माया जमा करणाऱ्या नेत्यांची संख्या सगळीकडेच मोठी आहे. त्यापैकी थोड्याथोडक्यांनी जरी रामशेठ यांच्या दातृत्वाचा कित्ता गिरवला तर दुर्बल घटकांपैकी कुणीही मूलभूत गरजांपासून वंचित राहणार नाही.**


# जनसेवेचा अखंड यज्ञ..!

मानवी जीवनाचे खरे सार्थक कशात असते याचे उत्तर जर एखाद्या व्यक्तिमत्त्वात शोधायचे असेल, तर रायगडचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. स्वतःच्या कर्तृत्वाने यशाची उत्तुंग शिखरे गाठत असतानाच समाजातील शेवटच्या घटकाच्या कल्याणाची चिंता मनात बाळगणारा हा कर्मयोगी आज वयाची पंचाहत्तरी पूर्ण करीत आहे. त्यांचा वाढदिवस म्हणजे केवळ एका व्यक्तीच्या आयुष्यातील अमृत महोत्सवी टप्पा नसून तो लोकहित, शिक्षणप्रेम, विकासदृष्टी आणि माणुसकीच्या मूल्यांचा उत्सव आहे.

पनवेल तालुक्यातील न्हावाखाडी येथील मातीत जन्मलेले आणि त्या भूमीच्या संस्कारांनी घडलेले लोकनेते रामशेठ ठाकूर हे नाव आज फक्त एका राजकीय नेत्याचे नाही, तर विश्वास, विकास, कार्यतत्परता आणि लोकाभिमुखतेचे प्रतीक बनले आहे. आपल्या अविरत परिश्रमाने त्यांनी शिक्षण, उद्योग, समाजसेवा आणि राजकारण या क्षेत्रांत यशस्वी वाटचाल केली, पण या प्रवासात त्यांनी कधीही समाजाशी असलेली आपली नाळ तुटू दिली नाही. उलट जसजसे यश वाढत गेले, तसतशी समाजाप्रति असलेली त्यांची बांधिलकी अधिक दृढ होत गेली.

प्रत्येक यशस्वी व्यक्तिमत्त्वामागे संघर्षाची प्रेरणादायी कहाणी असते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचाही जीवनप्रवास त्याला अपवाद नाही. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून सुरू झालेली त्यांची वाटचाल जिद्द, चिकाटी, परिश्रम आणि दूरदृष्टी यांच्या बळावर यशाच्या शिखरापर्यंत पोहचली, मात्र त्यांनी कधीही आपल्या पूर्वार्धाचा विसर पडू दिला नाही. त्यांच्या स्वभावातील सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी समाजसेवक, शिक्षक, उद्योजक, राजकीय नेता, मार्गदर्शक अशा विविध भूमिका साकारल्या आणि प्रत्येक भूमिकेत लोककल्याणालाच सर्वोच्च प्राधान्य दिले.

कोणत्याही समाजाच्या विकासाचा पाया शिक्षणात असतो याची जाणीव लोकनेते रामशेठ ठाकूर यांना खूप लवकर झाली होती. म्हणूनच त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेत शिकून शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान देत हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात उजेड निर्माण केला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, त्यांना मोठी स्वप्ने पाहण्याची संधी मिळावी आणि आर्थिक अडचणीमुळे कोणाचे शिक्षण थांबू नये यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले व करीत आहेत.



राजकारण हे अनेकांसाठी सत्तेचे माध्यम असते, पण लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासाठी ते लोकसेवेचे साधन राहिले.

रायगडचे खासदार म्हणून कार्य करताना त्यांनी विकासकामांना चालना दिली, जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य दिले आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कार्यपद्धतीत दिखाऊपणा नव्हता; होती ती लोकांशी थेट संवाद साधण्याची आणि त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडवण्याची प्रामाणिक तळमळ. त्यामुळेच ते केवळ नेते राहिले नाहीत, तर 'लोकनेते' बनले.

समाजातील गरीब, वंचित, निराधार, शेतकरी, कामगार, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या प्रश्नांबाबत ते नेहमी संवेदनशील राहिले. एखाद्या गरजू व्यक्तीला मदतीची आवश्यकता असल्याचे अथवा कुणी संकटात असल्याचे कळताच त्यासाठी धावून जाण्याची त्यांची वृत्ती आजही कायम आहे.

संत गाडगेबाबा म्हणत असत, 'भुकेल्याला अन्न, तहानलेल्याला पाणी आणि गरजूंना मदत देणे हाच खरा धर्म.' लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्यात हीच भावना सातत्याने दिसून येते.

समाजाचा विकास केवळ आर्थिक किंवा शैक्षणिक प्रगतीने होत नाही, तर त्यासाठी सांस्कृतिक आणि सामाजिक जडणघडणही तितकीच महत्त्वाची असते. हे लक्षात घेऊन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कला, संस्कृती, साहित्य, क्रीडा आणि अध्यात्म या क्षेत्रांनाही प्रोत्साहन दिले. याद्वारे समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांच्या माध्यमातून घडले.

एखाद्या व्यक्तीचा अमृत महोत्सव वर्षभर साजरा होणे ही अत्यंत दुर्मीळ बाब आहे. हे भाग्य केवळ त्यांनाच लाभते ज्यांनी आयुष्यभर समाजासाठी काहीतरी वेगळे, भरीव आणि प्रेरणादायी कार्य केलेले असते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त वर्षभर आयोजित करण्यात आलेले विविध कार्यक्रम हे त्यांच्या कार्याचा गौरव तर होतेच, पण त्याहून अधिक जनतेच्या मनातील प्रेम, आदर आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त करणारे होते.

सर्वसाधारणपणे माणूस ६० वर्षांचा झाल्यावर त्याच्या सेवानिवृत्तीचा काळ सुरू होतो. अशा वेळी बहुतांश लोक विश्रांतीचा विचार करतात, मात्र लोकनेते रामशेठ ठाकूर यांची कार्यशक्ती, जिद्द आणि समाजासाठी झटण्याची वृत्ती आजही तरुणांना प्रेरणा देणारी आहे. वयाची ७५ वर्षे पूर्ण करतानाही ते तितक्याच ऊर्जेने लोकांच्या भेटी घेतात, त्यांच्या समस्या ऐकतात, सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात आणि विकासाच्या नव्या संकल्पनांवर काम करतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील हीच ऊर्जा त्यांना इतरांपेक्षा वेगळे आणि विशेष बनवते.

जे का रंजले गांजले,
त्यासी म्हणे जो आपुले।
तोचि साधू ओळखावा,
देव तेथेंचि जाणावा॥

या जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा प्रत्यय लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्यातून वारंवार येतो. समाजातील दुर्बल, गरजू, उपेक्षित घटकांना मदतीचा हात देणे, संकटसमयी त्यांच्या पाठीशी उभे राहणे आणि त्यांच्या आयुष्यात आशेचा प्रकाश निर्माण करणे हे त्यांच्या जीवनाचे ध्येयच बनले आहे.

आज आपल्या वयाची ७५ वर्षे पूर्ण करणाऱ्या या थोर लोकनेत्याला मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांच्या कार्याचा सुवर्णकाळ आणखी प्रदीर्घ होवो, त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांना दिशा देत राहो आणि जनतेच्या प्रेमाने नटलेला त्यांचा शताब्दी महोत्सवही याच उत्साहात, याच अभिमानाने आणि याच कृतज्ञतेने साजरा होवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना...!

सागराएवढी विशालता,
हिमालयाएवढी उंची लाभो!
जनसेवेचा हा अखंड यज्ञ,
शताब्दीपर्यंत अविरत चालो!
कर्मयोगाचा हा प्रवास,
नित्यनवे शिखर गाठो!
लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे जीवन
अविरत प्रेरणागाथा ठरो!

**-समाधान पाटील,**
वृत्तसंपादक, दै. रामप्रहर

# उरण-मोरा रोडवर दुचाकींच्या धडकेत दोघांचा मृत्यू

**उरण : बातमीदार**



उरण ते मोरा रोडवरील हरिश्चंद्र गावंड उद्यानासमोर रविवारी (दि. ३१) मध्यरात्री ३ वाजता दोन दुचाकींची समोरासमोर भीषण धडक होऊन दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. उरण पोलीस ठाण्यात दाखल माहितीनुसार मोरा येथून सीबी शाईन मोटारसायकल क्र. एमएच-४६-बीयू-०४२१वरून महेश प्रल्हाद चांदेकर (३५, रा. बोरी मागिरदेव परिसर, डोंगरआळी, उरण) हे उरणकडे येत होते. त्याच वेळी उरणकडून मोरा दिशेने बुलेट मोटारसायकल क्र. एमएच-०३-डीपी-१९४८ वरून निखील दीपक कुकडे (३८, रा. शिवसागर अपार्टमेंट, नागाव पोलीस लाईनसमोर, नागाव रोड, उरण) हे जात होते. हरिश्चंद्र गावंड उद्यानासमोर दोघांनीही आपापली वाहने बेदरकारपणे चालवून रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करत एकमेकांना जोरदार धडक दिली.

या धडकेत दोघेही गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळले. अपघाताची माहिती मिळताच उरण पोलीस घटनास्थळी दाखल झाले. दोन्ही जखमींना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. याप्रकरणी वैभव यशवंत कडू यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उरण पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. १६६/२०२६ नुसार बीएनएस कलम १०६(१), १२५(ब), २८१ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ व भादंवि कलम ३०४ अ, ३३८, २७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघातस्थळी सपोनि. स्वप्नील केदार यांनी पंचनामा केला असून प्राथमिक तपासही तेच करीत आहेत. १ जूनला सकाळी गुन्हा दाखल करण्यात आला.

उरण-मोरा मार्ग महामार्गासारखा असून रस्त्यावर एकही गतिरोधक नसल्याने वाहने सुसाट धावतात. अपघात झालेल्या ठिकाणी गतिरोधक असता तर वाहनांचा वेग कमी होऊन दोघांचे प्राण वाचण्याची शक्यता होती, अशी प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. वारंवार होणारे अपघात रोखण्यासाठी या ठिकाणी तातडीने गतिरोधक बसवावेत, अशी जोरदार मागणी जनतेकडून होत आहे.

# पनवेलमध्ये महिलांसाठी कॅन्सर जनजागृती, मोफत तपासणी शिबिर

## ६६ महिलांनी घेतला लाभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दि.बा. पाटील यांचे जन्मशताब्दी वर्ष व उर्मिला दि.बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त पनवेल-उरण आगरी समाज मंडळ पनवेल, राजस्थानी महिला मंडळ पनवेल व रुधिरसेतू सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आगरी समाज हॉल, पनवेल येथे महिलांसाठी कॅन्सर जनजागृती व मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

महिलांमध्ये गर्भाशयमुख कर्करोगाची जनजागृती करणे या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. शिबिरात ६६ महिलांनी सहभाग नोंदवून लाभ घेतला. सहभागी महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.





यावेळी कर्करोगतज्ज्ञ डॉ. विवेक सुकुमार व डॉ. कस्तुरी बरुआ यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

शिबिराला नगरसेवक परेश ठाकूर व सुमित झुंजारराव यांनी सदिच्छा भेट दिली. तपासणी प्रक्रियेची माहिती घेतली तसेच उपस्थित महिला, वैद्यकीय तज्ज्ञ व स्वयंसेवकांशी संवाद साधला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी पनवेल-उरण आगरी समाज मंडळ पनवेलचे सचिव बी. पी. म्हात्रे, कोषाध्यक्ष विजय द. गायकर, उपाध्यक्ष जे. डी. तांडेल, मेघा तांडेल, मनस्वी पाटेकर, मनीषा पाटील, विद्याधर; राजस्थानी महिला मंडळाच्या सुनंदा कोठारी, धनश्री बंथिया, पल्लवी मुनोत, रुधिरसेतू सेवा संस्थेचे सुरेश रिसबूड, डॉ. नरेंद्रकुमार दसरे, उन्मेष लोहार, मनीषा बोरा, उज्ज्वला भिसे, विद्या गायकर व साम्य लोहार यांनी परिश्रम घेतले.

## आज नवीन पनवेलमध्ये महिलांसाठी मोफत कॅन्सर तपासणी व आरोग्य शिबिर

**पनवेल** : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवस वर्षानिमित्त सेवाभावी संस्था श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने मंगळवारी (दि. २) सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयात ३० वर्षांवरील महिलांसाठी कॅन्सर जनजागृती व मोफत कॅन्सर तपासणी शिबिर तसेच मोफत आरोग्य तपासणी शिबिर होणार आहे.

शिबिरात विशेषतः गर्भाशय मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग व मुखाचा कर्करोग याबाबत जनजागृती व मोफत तपासणी केली जाणार आहे. याशिवाय बीएमआय, रक्तदाब, रक्तातील साखर, डोळ्यांची तपासणी, ईसीजी, रक्त तपासणी, क्षयरोग तपासणी, छातीचा एक्स-रे, फॅमिली प्लॅनिंग सल्ला आदी सुविधा उपलब्ध असतील तसेच तज्ज्ञ डॉक्टरांकडून स्त्रीरोग, अस्थिरोग, बालरोग, नेत्ररोग व दंतचिकित्सेविषयक मार्गदर्शन दिले जाणार असून एचपीव्ही लसीकरणाबाबतही माहिती देण्यात येणार आहे. त्याचबरोबर आयुष्मान आणि आभा कार्ड काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी डॉ. अस्मिता घरत (८४५४००९७६६), गौरव कांडपिळे (९९२०८६८००८) यांच्याशी संपर्क साधावा.

# नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते गरजू विद्यार्थ्यांना मोफत दप्तर वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ॐ चैतन्य कानिफनाथ मित्र मंडळाच्या वतीने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त गरजू विद्यार्थ्यांना मोफत दप्तर वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना दप्तराचे वाटप करण्यात आले.

शिक्षणाच्या बळावरच आपण जीवनात यशस्वी होऊ शकतो, असे प्रतिपादन माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी दप्तर वाटपावेळी केले. या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे नगरसेवक राजू सोनी, मंगेश पिळिवलकर, विकास गायकवाड, अतुल विधाते, विलास गायकवाड, अतुल जाधव, नितेश जाधव, वैभव खळदे, ओंकार कोल्हे, हर्ष खळदे, वृषभ विधाते, मंदार देसाई, महादेव गायकवाड, गणेश पिळिवलकर, जितेंद्र महाले, संदेश भोईर, तानाजी झुगे आदी उपस्थित होते.







**पनवेल : भाजप युवा नेते मयूर शेळके यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, माजी नगरसेवक अशोक शेळके आदी.**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# जीवना आणि दांडा जेट्टी प्रकल्पांमुळे श्रीवर्धनच्या समुद्रपातळीत बदल; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धनमध्ये सुरू असलेल्या जीवना जेट्टी आणि दांडा जेट्टी प्रकल्पांमुळे विकासाच्या नावाखाली किनारपट्टीच्या नैसर्गिक रचनेत बदल होत असल्याची चिंता आता स्थानिक नागरिकांमध्ये वाढू लागली आहे. अनेक महिन्यांपासून सुरू असलेली ही कामे अंतिम टप्प्यात पोहोचत असताना, समुद्राच्या पाणीपातळीतील बदल, किनाऱ्यावरील वाढता दाब आणि भविष्यातील संभाव्य धोके यावर गंभीर चर्चा सुरू झाली आहे.

पूर्वी ओहोटीच्या काळात १०० ते १५० मीटरपर्यंत समुद्र मागे सरकत असे. त्यामुळे किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात वाळूचा पट्टा दिसत होता. मात्र आता उन्हाळ्याच्या दिवसांतही समुद्राचे पाणी किनाऱ्यालगत कायम राहू लागले असून अनेक ठिकाणी ते थेट संरक्षण कठड्याला धडकताना दिसत आहे. यामुळे समुद्राच्या नैसर्गिक प्रवाहात आणि गाळ साचण्याच्या प्रक्रियेत बदल झाला आहे का, असा प्रश्न स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस जवळ आले आहेत. भरती, मुसळधार पाऊस आणि वादळी हवामान यांचा एकत्रित परिणाम झाल्यास समुद्राचे पाणी किनाऱ्यालगतच्या वस्त्यांपर्यंत पोहोचू शकते, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत. मागील वर्षी गणेशोत्सवाच्या काळात समुद्राच्या वाढलेल्या पाणीपातळीमुळे विसर्जनासाठी आलेल्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला होता. समुद्रकिनाऱ्यावरील उपलब्ध जागा कमी झाल्याने विसर्जन प्रक्रिया अवघड झाली होती. तो अनुभव अजूनही लोकांच्या स्मरणात असून यंदा परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.जेट्टी प्रकल्पांमुळे मत्स्यव्यवसाय, पर्यटन आणि सागरी वाहतुकीला चालना मिळेल, असा दावा केला जात असला तरी स्थानिक नागरिक या प्रकल्पांच्या उद्देशांबाबत प्रश्न उपस्थित करत आहेत.समुद्राच्या पाणीपातळीतील बदल, किनारपट्टीची धूप आणि जेट्टी प्रकल्पांचा पर्यावरणावर होणारा परिणाम याचा स्वतंत्र वैज्ञानिक अभ्यास करण्यात यावा, अशी मागणी स्थानिक नागरिक करीत आहेत.



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमधील स्टाफच्या वतीने शकुंतला रामशेठ ठाकूर यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शाळेतील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रती आदर व्यक्त करत त्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. उपशिक्षक हर्षल फडके, मनीषा मोरे, उत्कर्षा वाजरेकर, सपना चतुर्वेदी, लिपिक यतीन कोळी आणि क्रीडा शिक्षक संग्राम फोफेरकर उपस्थित होते.**

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर भीषण अपघात; दोघांचा मृत्यू, तिघे जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**



मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर सोमवारी सकाळी एका ब्रेक फेल झालेल्या तांदळाने भरलेल्या ट्रकने समोरील तेलाच्या कंटेनरला आणि एर्टिगा कारला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला असून या अपघातात ट्रक मधील चालक आणि क्लीनर दोन जणांचा जागीच मृत्यू झाला तर कार मधील तीन प्रवाशी जखमी झाले आहेत

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवरून ट्रक तांदूळ घेऊन पुण्याहून मुंबई कडे जातं असताना तो ढेकू गावाजवळ आला असता त्याचे ब्रेक फेल झाल्याने त्याने समोरील तेलाच्या कंटेनरला पाठीमागून जोरदार धडक दिली तर बाजूने जाणाऱ्या एर्टिगा कारला जोरदार धडक दिल्याने तीन वाहनांचं भीषण विचित्र अपघात झाला

या अपघातात ट्रक मधील चालक आणि क्लीनर यांचा ट्रकच्या केबिन मध्ये अडकून जागीच मृत्यू झाला तर कार मधील लीलाबाई सस्ते (वय ८०) मुकिंदा सस्ते (वय ५६) आणि महेंद्र पालं( वय ३९) तीन जण जखमी झाले आहे त्यांना तात्काळ एमजीएम रुग्णालय पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहेत

या अपघाताची माहिती मिळताच बोरघाट महामार्ग पोलीस, खोपोली पोलीस, आयआरबी यंत्रणा, हेल्प फाउंडेशनचे सदस्य, डेल्टा फोर्स, देवदूत यंत्रणा, लोकमान्य हॉस्पिटलची टीम तात्काळ घटनास्थळी दाखल होत अपघात ग्रस्त वाहनात अडकेलेल्या प्रवाशांना बाहेर काढून खोपोली नगरपालिकेच्या रुग्णालयात आणि एमजीएम रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे .

## विचुंबे ग्रामपंचायत हद्दीत कोट्यवधींची विकासकामे मार्गी -सरपंच प्रमोद भिंगारकर

**पनवेल : प्रतिनिधी**

विचुंबे ग्रामपंचायत हद्दीत विविध शासकीय निधीतून कोट्यवधी रुपयांची विकासकामे मार्गी लागली असल्याची माहिती लोकनियुक्त सरपंच प्रमोद भिंगारकर यांनी दिली. येत्या काही काळात आणखी विकासकामे विचुंबे ग्रामपंचायत हद्दीत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डिसेंबर २०२३ ते ऑगस्ट २०२५पर्यंत ६७ लाख २१ हजार ७०१ रुपयांची विकासकामे करण्यात आली. यात गटार बांधणे, रस्ते दुरुस्ती, डांबर खडीने रस्ते दुरुस्ती, सीसीटीव्ही कॅमेरे, रस्ते काँक्रिटीकरण, गटार सफाई, आरसीसी पाईप गटार बांधणे, शाळा दुरुस्ती करणे यासारख्या महत्त्वाची कामांचा समावेश आहे.



२०२५ ते २०२६ दरम्यान ९७ लाख ७ हजार २१८ रुपयांची विकासकामे करण्यात आली.

जिल्हा नियोजन, सार्वजनिक बांधकाम विभाग, आमदार निधी, सामाजिक विकास योजना, एमएमआरडीए अंतर्गत ११ कोटी ९९ लाख ६८ हजार ७१४ रुपयांची कामे करण्यात आली. यात विचुंबे येथील आठ कोटी रुपयांच्या नवीन पुलाचे बांधकाम करण्यात आली. सध्या हा पूल वाहतुकीसाठी उपयुक्त ठरत आहे.

पंधराव्या वित्त आयोगातून सीसीटीव्ही कॅमेरे, चेंबर सफाई आणि बांधकाम, पाणीपुरवठा लाईन, शौचालय, ट्रॅक्टर ट्रॉली खरेदी, हायमास्ट बसवणे अशी ४८ लाख ३८ हजार ६० रुपयांची कामे करण्यात आली.

नवीन पुलाचे काम सुरू असताना देखील विरोधकांनी विरोध सुरू ठेवला होता. मात्र हे काम देखील पूर्ण झाले. विचुंबे सार्वजनिक ग्रामपंचायत इलेक्शन २०२३मध्ये झालेल्या पराभवामुळे पुरुषोत्तम भोईर बिनबुडाचे आरोप करत आहे. आजपर्यंत विचुंबे हद्दीत न झालेली आणि रखडलेली अनेक कामे मार्गी लागली. रस्ते, गटारे, काँक्रिटीकरण इ. कामे पूर्ण झाली. विरोधकांना याचा पोटशुळ उठला आहे.

ग्रामपंचायतीला पहिल्यांदा २०२५मध्ये स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार देखील मिळाला. विचुंबे येथील पोलीस चौकी ते ओमकार पार्क एक, दोन, तीन कडे जाणारा रस्ता बऱ्याच वर्षानंतर पूर्ण झाला. विचुंबे हद्दीत गार्डन देखील बनवण्यात आले. विचुंबेमध्ये स्ट्रीट लाईटसाठी सोलर पॅनल कार्यान्वित आहेत.

ही सर्व कामे माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अरुणशेठ भगत, भारतीय जनता पार्टी विचुंबे आणि ग्रामपंचायतच्या प्रयत्नातून झाली आहेत, असेही सरपंच प्रमोद भिंगारकर यांनी अधोरेखित केले.


**TENDER NOTICE**

Sealed Tenders / Offers are invited **Shiva Complex Premises Co-op. Society Ltd, Plot No. -6, Sector - 19, New Panvel (E), Navi Mumbai – 410206.** For proposed Redevelopment in lieu of rights to sell the additional Shops/Offices from Builders / Developers of repute. The Tender Document can be collected from the **PMC Office- Urban Analysis and Solutions Consultancy Services, Arenja Tower, Shop No-26,27, plot no. 49, 50, 51, Sector-11, CBD Belpaur, Navi Mumbai- 400614 ( Contact No- Ar. Neha Raut -8803228888) from Date 02/06/2026 To 17/06/2026 (Both dates included) between 10.00 am to 5.00 pm on payment of Rs 30,000/- (Non-Refundable) by Demand Draft in favour Shiva Complex Premises Co-op. Society Ltd.** Sealed Tender Bids shall be submitted in the manner as prescribed in the instructions to tenderers as mentioned in Tender Document on and before **24/06/2026** by 5.00 pm in the Society Office.

The Society reserves right to reject any or all bids without assigning any reason

Date : 01/06/2026
Place : New Panvel (E),
Navi Mumbai

sd/- sd/- sd/-
Chairman/ Secretary /Treasurer
Shiva Complex Premises Co-operative Society Ltd,


## स्मृती सुगंध पुष्प-एक आत्मकथन पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्मृती सुगंध पुष्प-एक आत्मकथन या पुस्तकाचा भव्य प्रकाशन सोहळा ३१ मे रोजी पनवेल येथील संतसावता माळी सभागृहात अत्यंत उत्साहात पार पडला. डॉक्टर संपत ससाणे लिखित या पुस्तकाचे प्रकाशन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थिती संपन्न झाले.

या प्रकाशन सोहळ्याला प्रसिद्ध योगगुरू डॉक्टर प्रसाद विनोद, ज्येष्ठ हास्यकवी अशोक नायगांवकर, निवृत्त विशेष पोलीस महानिरीक्षक सुरेश खोपडे, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, नगरसेवक परेश ठाकूर, दर्शना भोईर,ॲडव्होकेट मनोज भुजबळ, अजय बहिरे,सुमित जुंजारराव, डॉ. अरुणकुमार भगत, माजी नगरसेवक तेजस कांडपिले यांच्यासह विविध क्षेत्रांतीलअनेक मान्यवरांनी या सोहळ्याला हजेरी लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

हे पुस्तक केवळ लेखकाच्या वैयक्तीक जीवनप्रवासाचे आत्मकथन नसून, गेल्या पन्नास वषारतील पनवेलच्या सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाची अत्यंत महत्त्वाची नोंद ठेवणारा एक ऐतिहासिक दस्तावेज असल्याचे मत मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले.



**पनवेल : येथील महापालिकेचे स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम यांचा वाढदिवस सोमवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन बबन मुकादम यांना वाढदिसवाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी नगरसेवक परेश ठाकूर, सुमित झुंजारराव यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.**


**परिशिष्ट क्र. १६**
(उपविधी क्र. ३५ अन्वये)
**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात / मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना**

**नोटीस**

**सरकारी नोकर** सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत/भूखंडावर/ गाळा/ बंगला क्र................. ....धारण करणाऱ्या **श्रीमती हरिश्चंद्र शिवराम पवार** यांचे तारीख १४/०३/२०२६ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून **१५** दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/ हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस / हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे दुपारी १२.०० वा. ते दुपारी ४.०० वा. पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : नवीन पनवेल.
दिनांक : ०१/०६/२०२६

**सही/-**
**सचिव**
सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, नवीन पनवेल



**PUBLIC NOTICE**

**NOTICE IS HEREBY GIVEN to the public at large that I, MR. JUZER ABDUL HUSAIN KURLAWALA** (also known as Mr. Juzer M. A. Kurlawala), residing at Panvel, has lost the Original Property Documents pertaining to my property described in the schedule hereunder written. A Lost Item Report has been successfully registered with the Navi Mumbai Police (Panvel City Police Station) under Register ID: NaT21fTYOq on 28th May, 2026. Any person(s) having any claim, right, title, interest, or objection in respect of the said property or the aforementioned lost documents by way of sale, mortgage, charge, gift, lease, inheritance, lien, or otherwise, is hereby requested to make the same known in writing to the undersigned within seven (7) days from the date of publication of this notice, along with supporting documentary evidence. If no claim or objection is received within the stipulated period, it will be presumed that no such claim exists, and I will proceed to apply for duplicate copies of the said documents from the competent authorities, and/or deal with the property in any manner I deem fit, free from all claims.

**Schedule of the Property & Lost Documents:**

**Property Description :** Bungalow Premises No. SE29B, 2nd Floor, Saif Enclave CHS Ltd., Kolkhe Peth, Panvel, Maharashtra - 410206.

**Property Owner :** Mr. Juzer Abdul Husain Kurlawala.

**Lost Document :** Original Agreement for Sale dated 24.01.2011, executed between M/s. Saif Developers and Mr. Juzer M. A. Kurlawala, registered at the office of the Sub-Registrar of Assurances, Panvel-1 at Sr. No. 1770, Receipt No. 1930.

**Date: 2nd June, 2026**
**Place: Panvel**

**Mr. Juzer Abdul Husain Kurlawala**
**Contact No.:** 8097123458
**Email:** JK1429@gmail.com



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना

ई निविदा सूचना क्र. १५/२०२६-२०२७ (मुंबई) करीता

दिनांक १३/०५/२०२६ रोजी दैनिक आपलं महानगर, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... रोहा औद्योगिक क्षेत्रातील ग्राहकांच्या नळजोडण्यावरील मीटरचे वाचन व केंद्रीय डेटा संकलनासाठी बिलिंग सॉफ्टवेअर वापरून, दोन वर्षांच्या कालावधीसाठी बिल गणनेकरिता मीटर वाचन व डेटा डिजिटलायझेशनच्या सेवा पुरविणे. | ₹ १२,२१,७८७.०० |
| २. | रोहा येथील कार्यालयीन इमारतीमधील उप अभियंत्यांची केबिन आणि इतर केबिनची दुरूस्ती करणे. | ₹ ९,६५,००३.०० |
| ३. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती...... रोहा औद्योगिक क्षेत्रातील गंगा नाल्यातील गाळ काढून स्वच्छ करणे. | ₹ १४,२१,५१७.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ११/०६/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशीलांनी मौजे कोंडप ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे कोंडप, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**


| मौजे | भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे.न. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|---|---|
| कोडप | बाळाराम जानु काथारा | २ | १ | ०-४९-०० |
| | | | | पो.ख ०-०४-०० |
| | | | | एकुन ०-५३-०० |


**श्री बाळाराम जानु काथारा यांच्या हीश्याची ०-०६-०० गुंठे जमिन**

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, इजमेंट, वारसाहक्क, बक्षीसपत्र, हुकूमनामा, दरखास्त, दिवाणी दावा वगैरे इतर कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणा-या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.


**ता. पनवेल**
**दिनांक : ०१/०६/२०२६**

**सही /-**
**ॲड. नितेश भरत घोडविंदे**
**१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मोबाईल : ९५९४१५६३८३**


02 जून
माजी खासदार, लोकनेते
मा. श्री.
रामशेठ ठाकूर
साहेब
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
75
अमृत
महोत्सवी वर्ष
शुभेच्छुक
सुधीर घरत
कामगार नेते,
राष्ट्रीय कोषाध्यक्ष, भारतीय पोर्ट अँड
डॉक मजदूर महासंघ - (बी.एम.एस.)



अगणित माणसे या जगात जन्मास येतात,
पण तुमच्यासारखे यशस्वी व्यक्तिमत्त्व
एखादंच जन्मास येतं...
माजी खासदार, लोकनेते
मा. श्री.
रामशेठ ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी
दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
75
अमृत
महोत्सवी वर्ष
विशाल ठाकूर
राकेश म्हात्रे
राहूल म्हात्रे
शुभेच्छुक
इंडियनऑयल
IndianOil
श्री स्वामी समर्थ फ्युएल स्टेशन
इंडीयन ऑईलचे अधिकृत विक्रेते
मुंबई गोवा हायवे, NH-66, हॉटेल सागर पॅलेस शेजारी, मु. पो. जिते, ता. पेण, जि. रायगड. ४०२१०७
E mail - shreeswamisamarth0205@gmail.com


अगणित माणसे या जगात जन्मास येतात,
पण तुमच्यासारखे यशस्वी व्यक्तिमत्त्व
एखादंच जन्मास येतं...
02 जून
माजी खासदार, लोकनेते
मा. श्री.
रामशेठ ठाकूर
यांना
अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
मच्छिंद्र सुदाम जाधव
आणि सुखम् परिवार
मो. नं. ९९८७७२९९८८
M. S. LOGISTICS
Fleet Owners & Transport Contractors
We Supply all Type of Container Vehicles and Tempo
सुखम् हॉस्पिटल
आणि आय. सी. यु. | सुखम् आयुर्वेदा
। डॉ. संतोष सुदाम जाधव
। डॉ. दिपाली संतोष जाधव । डॉ. प्राजक्ता मच्छिंद्र जाधव
9004657988 | 7400187988 | 9870028585
Panvel : Jasdanwala Complex, Visharali Naka, Old Panvel, Raigad - 410 206.
Tel.: 022-2748 2054. Email : sukhamhospital@yahoo.com
Karanjade : Beind Ganesh Temple, Ganesh Nagar, Karanjade. Ta-Panvel,
Dist. Raigad. Tel. : 9136049988. Email : sukhamhospital@gmail.com


02 जून
लोकनेता
75
अमृत
महोत्सवी वर्ष
माजी खासदार, लोकनेते
मा. श्री.
रामशेठ ठाकूर
साहेब, आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. मदन तुकाराम कोळी
मा. उपनगराध्यक्ष, प.न.पा.




अगणित माणसे या जगात जन्मास येतात, पण तुमच्यासारखे यशस्वी व्यक्तिमत्त्व एखादंच जन्मास येतं...
माजी खासदार, लोकनेते
आदरणीय
रामशेठ ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!
75 अमृत महोत्सवी वर्ष
सौ. कुंदा कृष्णा पाटील
मा. पंचायत समिती सदस्या
कृष्णा पाटील
मा. सरपंच
अध्यक्ष, प्रभाग क्र. २
पनवेल महानगरपालिका
शुभेच्छुक
श्री. कृष्णाशेठ पाटील सामजिक विकास मंडळ, पडघे
मु. पो. पडघे, ता. पनवेल, जि. रायगड
कुणाल कृष्णा पाटील
(युवा नेते)

02 जून
माजी खासदार, लोकनेते
75 अमृत महोत्सवी वर्ष
मा. श्री. रामशेठ ठाकूर
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
ॲड. प्रकाश बिनेदार
सभागृह नेता
पनवेल महानगरपालिका





माजी खासदार, लोकनेते
मा. श्री. रामशेठ ठाकूर
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
75 अमृत महोत्सवी वर्ष
शुभेच्छुक
हेमंत ठाकूर
(जेष्ठ नेते)
मयूर हेमंत ठाकूर
मे. विदुला एंटरप्रायजेस (गव्हर्मेंट रजिस्टर कॉन्ट्रॅक्टर)
(मु. पो. गव्हाण, पनवेल)





राजकारणावर समाजकारणाची मुद्रा उमटविणारे लोकनेते
माजी खासदार
02 जून
मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
एक हितचिंतक


02 जून
माजी खासदार,
लोकनेते
मा.श्री.
रामशेठ
ठाकूर
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
75 अमृत महोत्सवी वर्ष
शुभेच्छुक
विक्रम
यशवंत साबळे
उपनगराध्यक्ष,
खोपोली नगरपरिषद



तुमचे नेतृत्व
संघर्षांचे, स्थानिकांचे,
प्रकल्पग्रस्तांचे
आणि जनहिताचे...
02 जून
जनार्दन भगत शिक्षण
प्रसारक संस्थेचे चेअरमन
माजी खासदार
श्री.
रामशेठ
ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक
शुभेच्छा!
75 अमृत महोत्सवी वर्ष
शुभेच्छुक
अँड. निरंजन डावखरे
आमदार, कोकण पदवीधर मतदारसंघ


लोकनेते श्री रामशेठ ठाकूर
अमृत महोत्सव
जाणीव एक सामाजिक संस्था पनवेल
रायगड जिल्ह्याचे भाग्यविधाते,
माजी खासदार
लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांचा
अमृत महोत्सव निमित्त
जाणीव एक सामाजिक संस्था, व अभिनव युवक मित्र मंडळ
यांच्या संयुक्त विद्यमाने
पनवेल शहरातील
दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा
सत्कार समारंभ
तसेच व्याख्याते प्रा.विजय नवले यांचे
करिअर मार्गदर्शन शिबिर
गुरुवार, दिनांक ०४ जून २०२६ रोजी, सायंकाळी ०६. ०० वाजता
• अधिक माहितीसाठी संपर्क •
• महेश सरदेसाई
9323266163
• रूपेश नागवेकर
9820666768
• अल्पेश पाडावे
9082012367
पनवेल शहरातील दहावी व बारावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांनी आपली नावे व मार्कलिस्टची
झेरॉक्स प्रत ३१ मे २०२६ पर्यंत नितीन जयराम पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात जमा करावे.
नितीन जयराम पाटील
संस्थापक-अध्यक्ष
जाणीव एक सामाजिक संस्था


BOI
Get 7.75% p.a.
For Non-Callable, Super Senior Citizens
Get 7.60% p.a.
For Non-Callable, Senior Citizens
Get 6.85% p.a.
For Non-Callable, Other Citizens
Give Your Savings the Power of
Extraordinary Returns
with BOI Fixed Deposit
For 3 Years
Features & Advantages
• For deposits of less than ₹3.00 Crs.
• On Callable Deposit – Rate of interest as high as 7.60% p.a. for Super Senior Citizen & 7.45% p.a. for Senior Citizen and 6.70% for Other customers for a tenure of 3 Years.
• Loan Against Fixed Deposit & Premature Withdrawal Facility - Available on Callable Deposit
• Limited Period Offer
Note: Avail Non-callable deposit benefits on investments above ₹1 crore with a tenure of 1 to 3 years.
SAFE BHI
GUARANTEED RETURN BHI
Bank of India
Relationship beyond banking
Toll Free No.: 1800 220 229 / 1800 103 1906 | : 7997987601
Visit : www.bankofindia.bank.in | Follow us on


WISHING YOU MANY MORE YEARS IN YOUR MISSION TO CHANGE LIVES.
HAPPY BIRTHDAY
SHRI. RAMSHETH THAKURJI (Ex. MP)
SIMRAN MOTORS
EXPERIENCE THE NEW WAY OF LIFE
HURRY UP!
UNFORGETTABLE DEALS ON WHEELS!
"Your Dream Car, Now Within Reach"
Only At SIMRAN MOTORS
TAKE TEST DRIVE AND WIN ASSURED GIFTS
BOOK NOW
Also Available S-CNG
SPECIAL OFFER
100% On-Road Funding*
Spot Evaluation*
Ever Highest Discounts*
Affordable EMI*
Highest Exchange Bonus*
Low Down Payment*
Visit Your Nearest Maruti Suzuki Simran Motors Today!
MARUTI SUZUKI ARENA 9223589145
NEXA 8657759818
MARUTI SUZUKI COMMERCIAL 8691043034
TRUE VALUE 9223161420
OUR PRESENCE:
PANVEL 9223589145
AIROLI 9223161411
CHOWK 9373830579
KARJAT 9223589145
WADKHAL 9223161473
ALIBAG 9223161461
NAGOTHANE 9223161514
MANGAON 9223161426
MAHAD 9767006043
HEAD OFFICE (PANVEL):
Plot No. 2-8, Sector 15, Opp. Garden Hotel, Old Mumbai - Pune Highway,Panvel, Maharashtra 410206



MAHARERA NO.: P52000053727
Available on maharera.maharashtra.gov.in
SAI WORLD CITY, 38 ACRE TOWNSHIP
PHASE 2 - OC RECEIVED
Club VEGAS
PROJECT HALLMARKS
G+33 Storeyed Towers
2, 2.5, 3 & 4 BHK Luxury Homes
Themed Landscaping
50,000 Sq.Ft. Club Vegas
World-class Amenities
SAI WORLD CITY PANVEL
LOCATION ADVANTAGES: Navi Mumbai International Airport - 5 Mins. | Mumbai- Pune Expressway - 2 Mins | Panvel Railway Station - 7 Mins | Delhi Public School (DPS) - 5 Mins
Mumbai Trans Harbour Link - 10 Mins | Jawaharlal Nehru Port Trust (JNPT) - 20 Mins | Close proximity to Schools, Malls, Hotels and Banks - 5 Mins
PARADISE GROUP
Your World. Our Vision.
ISO - 9001: 2015 Certified Organization
98330 90000
www.paradisegroup.co.in | Email: enquiry@paradisegroup.co.in
Disclaimer: All the specifcation, design, facilities, dimensions, etc. are subject to the approval of the respective authorities & developers and would be changed if necessary. The discretion remains with the developers.


Developed By
MAHAAVIR
MAHAAVIR LABDHI
BEAUTIFUL SEA FACING 2 & 3 BHK APARTMENT'S
At URAN, Near Atal Setu & Navi Mumbai Airport
02 जून
Happy Birthday,
Shree. Ramshethji Thakur
(Ex-MP)
Best wishes on your Birthday.
Wishing you another year
of great accomplishments!
Ongoing Sea Facing Project
Site Add.: Mahaavir Labdhi located at CTS No.420A, 420B, 420C, 420D and 403, Village Mhatavli, Taluka Uran, Dist. Raigad
Call: 98673 11345 / 022-41572600
MahaRERA Registration No.: P52000045246 & is available on the website https://maharera.mahaonline.gov.in | *T&C APPLY
Corporate Add.: Mahaavir Buildcon LLP, 302-306, Persipolis, Plot - 74, Sector - 17, Vashi, Navi Mumbai 400 703 | www.mahaavir.com



COURTYARD
WATER FRONT RESIDENCES
COURTYARD LOCATION ADVANTAGES
The location of a venture determines its appeal. "COURTYARD" in Navi Mumbai is attractive, being situated in the promising Panvel node, which offers all the conveniences for a comfortable lifestyle. Come here and experience the convenience
Near Panvel Station
Close to Expressway
Near Proposed InternationalAirport
Convenient Amenities Nearby
Near Panvel Bus Depo
Short Drive to Central Park
Lakhanis
BENCHMARK OF EXCELLENCE
60+ Projects Delivered
5000+ Happy Families
30+ Years of Legacy
5 Million+ Sq.ft. Delivered
Site Add: Plot No. 505, Near Panvel Yard Market, Old Mumbai Pune Highway, Panvel - 410 206
Office Add: 18th Floor, Satra Plaza, Sector 19D, Plot No.20, Vashi, Navi Mumbai 400705
0702 603 7899
www.lakhanibuilders.in



02 जून
75 अमृत महोत्सवी वर्ष
रायगड जिल्ह्यातील
दानशूर व्यक्तिमत्व...
लोकनेते
माजी खासदार
मा. श्री.
रामशेठ
ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
कृपाशंकर तिवारी



रायगडातील दानशूर व्यक्तिमत्व!
माजी खासदार, लोकनेते
मा. श्री.
रामशेठ
ठाकूर
02 जून
आपणांस
अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त
अनंत शुभेच्छा !
WellPure
Timeless beauty, powered by nature
Keshasvi
Your secret for beautiful hair
Buy Now
gandhar group
Follow us at
@naturepurewellness
Also available on


02 जून
तुमचे नेतृत्व संघर्षाचे, स्थानिकांचे, प्रकल्पग्रस्तांचे आणि जनहिताचे...
माजी खासदार, लोकनेते
आदरणीय
रामशेठ ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!
75 अमृत महोत्सवी वर्ष
शुभेच्छुक
श्री महालक्ष्मी कन्स्ट्रक्शन
प्रोप्रा. मंगेश पिलविळकर


माजी खासदार, लोकनेते
मा.श्री. रामशेठ ठाकूर
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा!
SHREE CONSTRUCTION
OUR SERVICES
STONE CRUSHER OWNER
RMC PLANT OWNER
EARTHWORK CONTRACTOR
BUILDERS & DEVELOPERS
ROAD WORK ONTRACTOR
CIVIL WORK CONTRACTOR
INDUSTRIAL OIL SUPPLIER
BUILDING MATERIAL SUPPLIER
BASEMENT EXCAVATION CONTRACTOR
PRODUCTION SITE:
GAVHAN PLANT: Survey No.356/9, Gavhan Village, Jasai Uran, Raigad, Maharashtra
KUNDEVAHAL PLANT: Survey No. 61, Kundevahal Village, Raigad, Maharashtra
PROPRIETOR: SHRI. MANOJ M. ANGRE (9322121312)


राजकारणावर समाजकारणाची मुद्रा उमटविणारे लोकनेते...
माजी खासदार, लोकनेते
मा.श्री. रामशेठ ठाकूर
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
Raman N. Bohara
Balaji Stone Crushing Plant
Site : At. Bombavi Pada, Post Owle, JNPT, Ex. Highway, Near Gavhan Phata, Tal. Panvel, Navi Mumbai-410206.
Off. : 170, M. G. Rd., Mahavir Chowk, Behind Amantran Hotel, Panvel, Navi Mumbai. Tel. 022-27451406. Telefax : 022-27461800.


अगणित माणसे या जगात जन्मास येतात, पण तुमच्यासारखे यशस्वी व्यक्तिमत्त्व एखादंच जन्मास येतं...
02 जून
लोकनेते
माजी खासदार
मा. श्री. रामशेठ ठाकूर
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा!
75 अमृत महोत्सवी वर्ष
शुभेच्छुक
विजय चिपळेकर
मा. नगरसेवक, पनवेल महानगरपालिका


तुमचे नेतृत्व संघर्षाचे, स्थानिकांचे, प्रकल्पग्रस्तांचे आणि जनहिताचे...
माजी खासदार, लोकनेते
श्री. आदरणीय रामशेठ ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
अनिल भगत
मा. नगरसेवक, पनवेल महानगरपालिका


मा. श्री. माजी खासदार, लोकनेते
रामशेठ ठाकूर
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. दिलीप बाळाराम पाटील, अध्यक्ष
नगरसेवक, पनवेल महानगरपालिका प्रभाग क्रमांक १२, कामोठे
श्री. मंदार पनवेलकर (प्रशासकीय अधिकारी)
कै. बाळाराम धर्मा पाटील शिक्षण संस्थेचे
सुषमा पाटील विद्यालय, ज्युनिअर कॉलेज व सिनिअर नाईट कॉलेज कामोठे
(मराठी, इंग्रजी व सेमी इंग्रजी माध्यम)
पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग
(प्लॉट नं. ३९, सेक्टर ११, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड.)
पदवीधर होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आजच संपर्क करा!
९६६४०४०८२४ / ८४२५८८८९१४
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अभ्यास केंद्र, कामोठे
एस. एन. डी. टी. महिला मुक्त विद्यापीठ, मुंबई अभ्यास केंद्र, कामोठे
B.A / B.Com. / M.A. / M.Com.


02 जून
माजी खासदार, लोकनेते
मा.श्री. रामशेठ ठाकूर
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा!
75 अमृत महोत्सवी वर्ष
शुभेच्छुक
ॲड. मनोज कृष्णाजी भुजबळ
नगरसेवक : पनवेल महानगर पालिका
मा. सभापती : सार्वजनिक बांधकाम, विकास व नियोजन समिती
अध्यक्ष : पनवेल वकील संघटना
उपाध्यक्ष (संघटन) : अ.भा. अधिवक्ता परिषद, रायगड जिल्हा


तुमचे नेतृत्व संघर्षाचे, स्थानिकांचे, प्रकल्पग्रस्तांचे आणि जनहिताचे...
माजी खासदार, लोकनेते
श्री. आदरणीय रामशेठ ठाकूर
आपणांस अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. सुरेश पाटील
राष्ट्रीय महामंत्री : भारतीय मजदूर संघ (पोर्ट अँड डॉक महासंघ)
सदस्य : वेतन करार समिती (बीडब्ल्यूएनसी), आयपीए दिल्ली
जिल्हाध्यक्ष : भारतीय मजदूर संघ, रायगड
अध्यक्ष : जेएनपीए जनरल कामगार संघटना


माजी खासदार, लोकनेते
मा.श्री. रामशेठ ठाकूर
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
75 अमृत महोत्सवी वर्ष
शुभेच्छुक
विकास ना. घरत
नगरसेवक, पनवेल महानगरपालिका
डॉ. अरुणकुमार शं. भगत
नगरसेवक, पनवेल महानगरपालिका

# सेवाव्रती

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस म्हणजे सर्वसामान्य माणसासाठी आनंदाचा आणि प्रेरणा देणारा दिवस म्हणून ओळखला जातो. समाजातील प्रत्येक घटकासाठी त्यांनी आपले योगदान दिले आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अमृत महोत्सवी वर्ष मोठ्या उत्साहात साजरे झाले. यानिमित्त वर्षभर अनेक कार्यक्रम झाले. नागरिकांना गणपतीचा मोफत शिधा वितरित करण्यात आला. मुला-मुलींच्या तालुकास्तरीय थ्रो बॉल स्पर्धा



झाल्या. ७५ अभंगांचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात आले. रिटघर येथे शुभचिंतन समारंभ झाला. गव्हाण-कोपर येथे भव्य सांस्कृतिक सोहळा झाला. 'गूज मनीचे' या नाटकाचे आयोजन करण्यात आले. उलवे नोडे येथे विंग्ज ऑफ हॅप्पीनेस, विचुंबे येथे कबड्डी स्पर्धा, 'कृष्ण वेणुनाद' हा सांगीतिक कार्यक्रम, कामोठे येथे 'कर्मयोगी' हा जीवनपट तसेच खारघर येथे 'लोकनेता : एक युगपुरुष' या जीवनपटाचे सादरीकरण करण्यात आले. शिवाजीनगर गावातील २५० महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त आयोजित अभीष्टचिंतन सत्कार तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था संचलित रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या नवीन अत्याधुनिक इमारतीचा उद्घाटन सोहळा उलवे नोड येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्यदिव्य आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाला. या सोहळ्यापूर्वी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार आणि त्यांच्या सुविद्य पत्नी प्रतिभाताई पवार यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी सदिच्छा भेट देत त्यांचे अभीष्टचिंतन करून शुभेच्छा दिल्या.

हेन्री फोर्ड म्हणतात, ''जितके तुम्ही जास्त कष्ट कराल तितके तुम्ही जास्त नशीबवान व्हाल.'' यश हा अपघात नाही. तो नशिबाचा खेळ नाही. समृद्धी काही आकस्मिक येत नाही. संपत्ती आकाशातून येत नाही. यश हे कष्ट व श्रम करून मिळते. विचारवंत व सुप्रसिद्ध लेखक स्टॅनली आणि डॅको म्हणतात, ''स्वकर्तृत्वाने लक्षाधीश झालेल्यांपैकी ८५ टक्क्यांपेक्षा जास्त लोकांनी त्यांच्या यशाचे श्रेय अपार कष्टांना दिले आहे. कठोर परिश्रमाच्या बळावर बिल गेटस् यांनी अपूर्व यश संपादन केले. जगभर ख्याती व लौकिक मिळवलेले हे नाव आहे.

अफाट कर्तृत्वाचे महामेरू लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मेहनत, कष्ट, परिश्रम व आत्मविश्वासाच्या जोरावर यशस्वी वाटचाल केली आहे. त्यांना सामाजिक, शैक्षणिक तसेच राजकीय कार्यात सतत यश मिळत गेले व यापुढेही मिळत राहील यात शंका नाही. जीवनात महान कार्ये काही स्वतःहून घडून येत नाहीत. त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. आयुष्याच्या विकासयात्रेला उंची प्राप्त करून देण्याकरिता श्रमाची, कष्टाची, दृढ संकल्पांची आवश्यकता असते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शरीर-श्रम व स्वावलंबन यांना महत्त्व दिले. वयाच्या पाचव्या वर्षापासून कष्ट करण्यास सुरुवात केली. त्यांनी कष्टाच्या सगळ्या आठवणी जपून ठेवल्या आहेत. आजही ते दिवसातून १५-१६ तास काम करतात.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांना कुठलीच गोष्ट अशक्य नाही. बायबलमध्ये लिहिले आहे... मोहरीच्या दाण्याइतकाही विश्वास तुम्हाला असेल आणि त्या विश्वासाच्या बळावर तुम्ही पर्वताला म्हणाल 'चल इथून, त्या पलीकडच्या जागेवर जा', जाईल तो आणि कुठलीच गोष्ट तुमच्यासाठी अशक्य राहणार नाही. मोखाड्यासारख्या अतिशय दुर्गम आदिवासी भागात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आधुनिक सुखसोयींनी युक्त रयत शिक्षण संस्थेचे शैक्षणिक संकुल उभारून दिले.

एक शास्त्र संकेत आहे 'दान देताना सर्वात पुढे असावे.' लोकनेते रामशेठ ठाकूर या धर्म-रूढीचे स्वागत नेहमी करतात. यावर्षी सातारा जिल्ह्याच्या जावळी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा, बिभवी येथील विकासासाठी, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व एस.पी. जुनिअर कॉलेज जुचंद्र, ता. वसई येथील विद्यालयाला नवीन इमारत बांधण्यासाठी, रिटघर येथील श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचा सभामंडप बांधण्यासाठी आणि फरशी बसविण्यासाठी, नितळस येथील कुस्ती संकुलासाठी, पत्रकारांसाठी लोणावळ्यात फाईव्ह स्टार दर्जाच्या विश्रामधामसाठी, मेघना प्रदीप देशमुख यांना पायलटचे ट्रेनिंग घेण्याकरिता, वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी सानिया भोईर यांना तसेच कार्ला येथील सभामंडपासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आर्थिक मदत केली. बेलपाडा गावात सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर यांच्या १० लाख रुपयांच्या स्वनिधीतून अंगणवाडीसाठी नवीन इमारत बांधण्यात आली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यात अस्तित्वात असलेल्या सर्व क्षमता, दान देण्याचे मार्ग यानिमित्त कार्यरत होतात. मार्क ट्वेन म्हणतात, ''प्रत्येक जण स्वतःशीच समाधानी राहिला, तर वीर पुरुष आपल्याला पाहायला मिळणार नाही.'' जीवन आनंदात जावे याकरिता अमेरिकेतील डॉ. केरी बर्नाइट (जेरियाट्रिशन) म्हणतात ''देणे हेच खरे औषध आहे. आपण जेव्हा इतरांसाठी काही करतो, तेव्हा आपल्याला आतून आनंद होतो.''

सुप्रसिद्ध लेखक व वक्ता ब्रायन ट्रेसी म्हणतात, ''उच्चपदस्थ नेत्यांचा सर्वात महत्त्वाचा समान गुण म्हणजे संकटकाळात चांगले कार्य करण्याची त्यांची क्षमता. प्रत्येक क्षेत्रातल्या शिखरावरच्या लोकांनी त्यांच्या कार्यकाळात हे सिद्ध करून दाखवले की अटळपणे येणाऱ्या संकटात ते संकट परिणामकारकरीत्या हाताळण्याची क्षमता त्यांनी दाखवली.'' कोरोनाच्या महाभयंकर काळात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पनवेल, उरण, कळंबोली, खारघर, खांदा कॉलनी, उरणचा ग्रामीण भाग या ठिकाणी किमान लाख ते दीड लाख कुटुंबांना अन्नधान्य व इतर दैनंदिन गरजेच्या वस्तू दिल्या.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी घेतलेल्या अतिशय परिश्रमामुळे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था प्रगतिपथावर पोहचली आहे. या संस्थेच्या गव्हाण, कोपर, नवीन पनवेल, खारघर, नवी मुंबई, द्रोणागिरी नोड, उरण, खांदा कॉलनी आदी ठिकाणी अनेक शाळा-महाविद्यालये सुसज्ज इमारतीत उत्तम प्रकारे सुरू आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेत आपले शिक्षण पूर्ण केले. त्यामुळे ते रयत शिक्षण संस्थेशी मनापासून जोडले गेलेत. त्यांनी रयत शिक्षण संस्थेवर मनापासून आणि निस्वार्थीपणे प्रेम केले. रयतेला भरभरून दिले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पश्चात संस्थेसाठी पूर्णपणे वाहून घेणारे हाताच्या बोटावर मोजण्याएवढेच लोक आहेत. त्यात लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव अग्रणी आहे. या संस्थेच्या प्रगतीसाठी त्यांनी स्वतःच्या दातृत्वाने १०० कोटींहून अधिक रुपयांची आर्थिक मदत केली आहे. यंदाही संस्थेच्या विकासासाठी तीन कोटी ६२ लाख रुपयांची देणगी दिली. याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर आणि नगरसेवक परेश ठाकूर यांचा रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार यांच्या हस्ते सातारा येथे कर्मवीरभूमीत हृद्य सत्कार करण्यात आला. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त संस्थेच्या वतीने अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या हस्ते अभीष्टचिंतनही करण्यात आले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी धार्मिक तसेच लोकाभिमुख सामाजिक कामावर भर दिला आहे. दान देताना धर्म पाहिला नाही, जात पाहिली नाही. अत्यंत आनंदी मनाने आपली भरली ओंजळ रिती केली. शांतादेवी मंदिर गव्हाण, साईबाबा मंदिर शेलघर, हनुमान मंदिर कोपर या मंदिरांची उभारणी लोकवर्गणी आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या देणगीतून झाली. बारापाडा गावात असलेल्या भवानी माता मंदिराचा जीर्णोद्धार आणि मूर्तींचा प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न झाला. मंदिराच्या कामासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अडीच लाख रुपयांची देणगी दिली. यापूर्वी या मंदिराचे काम सुरू होताना त्यांनी एक लाख रुपयांची देणगी दिली होती. सोलापूर येथील श्री तीर्थक्षेत्र नंदेश्वरसाठी २१ लाख रुपयांची देणगी जाहीर केली.

लोकनेते रामशेठ ठाकूर कसलाही भेदाभेद मानत नाहीत. सढळ हस्ते ते मदत करतात. घरी येणाऱ्या प्रत्येकाशी आदराने बोलतात. गरजू विद्यार्थ्यांना, खेळाडूंना मदतीचा हात देतात, त्यांच्या ध्येयाप्रत जाण्यासाठी मदत करतात.

जगातील सर्व मान्यवरांनी आपल्या पोषाखाची एक रचना व शैली सतत मेंटेन केलेली असते. यशस्वी होण्यासाठी हे आवश्यक आहे. साधे, सुंदर, स्वच्छ व नीटनेटके लोकांना मोहवितात. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा पोषाखातील साधेपणा हेच त्यांचे सामर्थ्य आहे. त्यांना माझ्या आणि माझ्या परिवाराच्या तसेच कोपरगाव (शिर्डी)वासीयांच्या वतीने मनःपूर्वक शुभेच्छा!

**-प्रा.डॉ.विजयकुमार रणदिवे, पनवेल**



# समाजसेवेचा अखंड दीपस्तंभ

समर्पण हा शब्द केवळ भावना व्यक्त करणारा नाही, तर आयुष्यभर जगण्याचा एक संस्कार आहे. स्वतःचे आयुष्य, बुद्धी, श्रम, संपत्ती आणि वेळ समाजाच्या कल्याणासाठी अर्पण करणे म्हणजे समर्पण. अनेक व्यक्ती समाजात मोठ्या पदांवर पोहचतात, संपत्ती कमावतात, प्रसिद्धी मिळवतात, पण समाजासाठी जगणारी माणसे फारच थोडी असतात. अशा दुर्मीळ व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे दानशूर लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब.

आपल्या आयुष्याची ७५ वर्षे अर्थात अमृत महोत्सवी वर्ष लोकनेते रामशेठ ठाकूर पूर्ण करीत आहेत. ही केवळ वाढदिवसाची औपचारिकता नसून समाजसेवेच्या सुवर्णमय प्रवासाचा गौरवशाली टप्पा आहे. जवळपास ५० वर्षांहून अधिक काळ त्यांनी आपले संपूर्ण जीवन समाजहितासाठी समर्पित केले. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, वैद्यकीय, अध्यात्मिक आणि जनकल्याणाच्या विविध क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान आज समाजासाठी कायम प्रेरणादायी असे आहे. त्यांच्या कार्यामागे प्रसिद्धीची अपेक्षा नाही; तर माणुसकी जपण्याची तळमळ आहे.

"उघडले भांडार, धन्याचा माल, मी तो हमाल भारवाही" या संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील भावार्थ त्यांनी आपल्या जीवनातून साकारला आहे. "आपल्याजवळ असलेली संपत्ती ही समाजाची ठेव आहे," या विचाराने त्यांनी गरीब, पीडित, शोषित, कष्टकरी आणि वंचित घटकांसाठी सातत्याने मदतीचा हात दिला. अनेकांच्या शिक्षणासाठी, वैद्यकीय उपचारांसाठी, घरासाठी, रोजगारासाठी आणि जीवन उभे करण्यासाठी त्यांनी निस्वार्थ मदत केली. म्हणूनच त्यांच्या दातृत्वाचा गौरव केवळ एका भागापुरता मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रभर पोहचला. राजकीय क्षेत्रात अनेक नेते निर्माण होतात, पण जनतेच्या मनात स्थान निर्माण करणारे लोकनेते अत्यंत दुर्मीळ असतात. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे खऱ्या अर्थाने जनतेच्या मनातील लोकनेते आहेत. समाजकारण हा त्यांच्या जीवनाचा गाभा आहे. लोकांची अडचण सोडवणे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करणे हे त्यांनी आयुष्यभर केले. त्यांच्या दारात आलेली व्यक्ती रिकाम्या हाताने परत गेली नाही, हे लोक आजही अभिमानाने सांगतात. एखाद्या रुग्णाला उपचारासाठी मदत असो, गरीब विद्यार्थ्याला शिक्षणासाठी आधार असो, क्रीडापटूंना प्रोत्साहन असो किंवा सांस्कृतिक उपक्रमांना मदत असो लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रत्येक क्षेत्राला आपुलकीने हातभार लावला.

गरीब कुटुंबातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे, आधुनिक शिक्षण ग्रामीण भागात पोहचावे आणि समाजातील प्रत्येक मुलाला संधी मिळावी यासाठी त्यांनी शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान दिले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या माध्यमातून उभ्या राहिलेली शाळा-महाविद्यालये आज हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडवत आहेत. इंग्रजी शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण गावागावात पोहचविण्याचे कार्य त्यांनी दूरदृष्टीने केले. रयत शिक्षण संस्थेशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते राहिले आहे. "कमवा आणि शिका" या तत्त्वावर त्यांनी स्वतःचे शिक्षण पूर्ण केले आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा प्रभाव आयुष्यभर जपला.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे सर्वात मोठे साधन आहे, या विचाराने त्यांनी शैक्षणिक संस्थांना मोठ्या प्रमाणावर मदत केली. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून अनेक शाळा, महाविद्यालये आणि वास्तूंना त्यांचे नाव देण्यात आले, ही त्यांच्या योगदानाची समाजाने दिलेली पोचपावती आहे. स्वतःची शिक्षण संस्था असतानाही रयत शिक्षण संस्थेत त्यांनी मातृसंस्था मानून कार्य केले आहे.

कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रांबाबतही त्यांची भूमिका अत्यंत सकारात्मक राहिली. ग्रामीण भागातील कलावंतांना व्यासपीठ मिळावे, युवकांना क्रीडा क्षेत्रात संधी मिळावी आणि सांस्कृतिक परंपरा जपल्या जाव्यात यासाठी त्यांनी सातत्याने मदत केली. अनेक क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक महोत्सव, कला उपक्रम आणि युवक विकास कार्यक्रमांना त्यांनी उदारपणे सहकार्य केले. समाजातील युवकांनी सकारात्मक मार्ग निवडावा आणि समाजहिताचे कार्य करावे यासाठी त्यांनी कायम प्रेरणा दिली. वैद्यकीय क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले आहे. आर्थिक परिस्थितीमुळे उपचार घेऊ न शकणाऱ्या अनेक रुग्णांना त्यांनी मदत केली. वैद्यकीय शिबिरे, आरोग्य सेवा, रुग्णालयांना मदत आणि गंभीर रुग्णांच्या उपचारासाठी त्यांनी केलेले कार्य अनेक कुटुंबांसाठी जीवनदायी ठरले. संकटकाळात मदतीसाठी धावून जाणारा नेता म्हणून त्यांची ओळख अधिक दृढ झाली. नैसर्गिक आपत्ती, पूर, दुष्काळ किंवा इतर संकटांच्या काळात त्यांनी समाजासाठी मोठ्या प्रमाणावर मदतकार्य उभे केले. संकटात सापडलेल्या लोकांसाठी अन्नधान्य, आर्थिक मदत आणि पुनर्वसनाच्या माध्यमातून त्यांनी दिलासा दिला. समाजातील तळागाळातील घटकांसाठी त्यांची संवेदनशीलता आजही तितकीच कायम आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे व्यक्तिमत्त्व जितके प्रभावी, तितकेच साधे आणि सहज आहे. श्रीमंती असूनही साधेपणा, लोकप्रियता असूनही विनम्रता आणि सत्ता असूनही माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांचे बोलणे, वागणे, लोकांशी जोडून घेण्याची पद्धत आणि प्रत्येकाच्या दुःखात सहभागी होण्याची वृत्ती यामुळेच ते जनमानसात घर करून आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पद्मश्री कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या कार्यात स्पष्टपणे दिसून येतो. त्यांच्या या प्रदीर्घ प्रवासात त्यांना कुटुंबाचीही मोलाची साथ लाभली. पत्नी सौ. शकुंतला ठाकूर यांचे सहकार्य, आमदार प्रशांत ठाकूर व युवा नेते परेश ठाकूर यांची साथ, तसेच आईवडील आणि जनार्दन भगतसाहेबांचे संस्कार हे त्यांच्या कार्यामागील प्रेरणास्थान राहिले.

आज लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी वर्ष पूर्ण करत असताना त्यांच्या कार्याचा गौरव करणे म्हणजे समाजसेवेच्या एका महान परंपरेचा सन्मान आहे. त्यांनी केलेले कार्य हे केवळ एका व्यक्तीचे यश नसून संपूर्ण समाजाला दिशा देणारे प्रेरणादायी पर्व आहे. त्यांच्या समर्पणाची, दातृत्वाची, लोकसेवेची आणि माणुसकीची ही अखंड ज्योत पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर हे केवळ एक राजकीय किंवा सामाजिक नेते नसून ते लोकांच्या सुखदुःखात सदैव धावून जाणारे लोकनेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या जीवनप्रवासाची सुरुवात अत्यंत साध्या वातावरणातून झाली. सामान्य माणसांच्या अडचणी, गरिबी, शिक्षणाचा अभाव आणि ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्न त्यांनी जवळून अनुभवले. त्यामुळे समाजासाठी काहीतरी मोठे करण्याची प्रेरणा त्यांच्या मनात लहानपणापासूनच निर्माण झाली. समाजातील दुर्लक्षित, वंचित आणि गरजू घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी संघर्षाचा मार्ग स्वीकारला. जनतेशी असलेली त्यांची जवळीक, लोकांप्रति असलेली आत्मियता आणि समस्यांवर तत्काळ उपाय शोधण्याची वृत्ती यामुळे ते अल्पावधीतच लोकप्रिय झाले. त्यांच्या नेतृत्वात नेहमीच साधेपणा, प्रामाणिकपणा आणि कार्यकर्त्यांप्रति आपुलकी दिसून आली. त्यांनी समाजसेवेला केवळ उपक्रमांपुरते मर्यादित ठेवले नाही, तर ती लोकचळवळ बनवली. त्यांच्या कार्यामुळे हजारो कुटुंबांना नवे आयुष्य मिळाले आणि अनेक युवकांना जीवनाची दिशा मिळाली.

"शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे" या विचारावर त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण प्राप्त केले आणि विविध क्षेत्रांत यश संपादन केले. शिक्षणाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचे त्यांचे स्वप्न आजही अनेक संस्थांमधून साकार होत आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर हे जनतेच्या मनातील नेते आहेत. त्यांचे नेतृत्व हे सत्तेच्या केंद्रस्थानी नसून लोकांच्या हृदयात आहे. त्यांनी कधीही पद, प्रतिष्ठा किंवा प्रसिद्धीचा हव्यास बाळगला नाही; उलट जनतेच्या सेवेलाच त्यांनी आपले कर्तव्य मानले. सामान्य माणसाशी संवाद साधण्याची त्यांची शैली, कार्यकर्त्यांप्रति असलेले प्रेम आणि प्रत्येकाच्या अडचणीत तत्परतेने उभे राहण्याची वृत्ती यामुळे त्यांच्याविषयी समाजात प्रचंड आदर निर्माण झाला आहे. सर्व समाजघटकांना ते आपलेसे वाटतात.

सर्वसामान्यांचा आधारवड, समाजसेवेचा अखंड दीपस्तंभ दानशूर व्यक्तिमत्त्व लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेबांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांना निरोगी आणि दीर्घायुष्य लाभो ही श्री साईचरणी प्रार्थना!

**-हरेश साठे, प्रसिद्धीप्रमुख, पनवेल**



# साहित्यप्रेमी व्यक्तिमत्त्व

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पनवेल येथे कोकण मराठी साहित्य परिषदेने आयोजित केलेला 'कृतार्थ संध्याकाळ' कार्यक्रम नुकताच उत्साहात झाला. त्यावेळी कोकण मराठी साहित्य परिषदेचे सल्लागार म्हणून त्यांचा उल्लेख करण्यात आला. खरंच त्यांच्यामध्ये साहित्यिक अंग आहे.

श्री चक्रधर स्वामी यांना लोक जसे 'सर्वज्ञ' म्हणतात, तशीच लोकनेते रामशेठ ठाकूर यांना मनुष्यस्वभावाची चांगली पारख आहे. विद्यार्थी असताना ते साहित्य लेखन करत होते. आपल्या भाषणात महाविद्यालयीन जीवनात त्यांनी 'प्रतापगडच्या वाटेवर' व 'भीड भिकेची बहीण' हे लेख लिहिल्याचे ते सांगत असतात. अलीकडे परवाच्या कार्यक्रमात ते म्हणाले, माझे मराठी साहित्याचे अभ्यासक, सहकारी बंधूंनो आणि भगिनींनो! मी आपला जो आहे तो असाच आहे. पहिल्या दिवशी शिक्षक असताना जो 'राम ठाकूर' होता ना, तो राम ठाकूरच आज आहे. लोकांनी मला 'रामशेठ' बनवलं, पण मी मनानं अजून रामशेठ झालेलो नाही. पैसे येऊन मी शेठ झालो, पण वृत्तीनं आणि भावनेनं मी काय शेठ झालेलो नाहीये. रयत शिक्षण संस्था आणि तिथले संस्कार मिळाले, जे महत्त्वाचं होतं. सर्व अठरापगड जातीचे लोक एकत्र येऊन जेवण-खाण करणं, एकत्र राहणं हे तिथे मिळालं आणि मग आपल्यासारख्या साहित्यिकांची संधी मिळाली. खरं बघायला गेलं तर माझा बीएचा स्पेशल विषय मराठी होता. मराठी संत वाङ्मयाचा इतिहास, कादंबरी, नाटक या सगळ्याचा अभ्यास माझा झालेला आहे, पण त्याच्यानंतर मी दगड आणि मातीमध्ये (बांधकाम व्यवसायात) असा गेलो की, मला इकडे वेळच नाही मिळाला. आता आपण एक जबाबदारी म्हणताय की, मराठी साहित्य संमेलन आपल्याकडे व्हावं अखिल भारतीय ना? तर ते व्हावं, माझी १०० टक्के तयारी आहे. म्हणजे आपण ज्या वेळी सांगाल, त्या वेळी तयारी आहे, घडवून आणूया. तारखा वगैरे काय असतील, तर ते थोडं करता येईल. खरा समाज घडवण्याचं काम हे साहित्यिक करतात. ते स्फूर्ती द्यायचं काम करतात आणि त्याच्यातून आपल्याला उभारी येते.



छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे लोकनेते रामशेठ ठाकूर हे १९६८ ते १९७२ या काळात शिक्षण घेत होते. १९६८-६९ला ते प्री-डिग्री कोर्स या वर्गात होते, तर पुढील तीन वर्षे ते बीए मराठी या वर्गात शिकत होते. याच काळात त्यांना प्राचार्य शंकरराव उनउने, प्रा. द.ता. भोसले, प्रा. मा.के. यादव, प्रा. श्रीधर हेरवाडे हे मराठी विषयासाठी प्राध्यापक म्हणून लाभले, जे अत्यंत तन्मयतेने शिकवत असत. प्राचार्य शंकरराव उनउने उर्फ बापू यांनी आपल्याला संत साहित्य शिकवल्याची आठवण लोकनेते रामशेठ ठाकूर यांना आजही आहे.

राजकीय आणि व्यावसायिक पटलावर वावरणारा हा लोकनेता मूळचा मराठी साहित्याचा सजग अभ्यासक आणि संवेदनशील साहित्यिक कसा आहे याचा उलगडा त्यांच्याच भाषणातून होतो. केवळ पदवी असणे वेगळे आणि जगण्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन साहित्यिक असणे वेगळे. एक उत्तम साहित्यिक नेहमी आपल्या मातीशी आणि तिथल्या भाषेशी जोडलेला असतो. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या भाषणात आगरी-कोळी संस्कृती आणि रायगड परिसरातील प्रादेशिक बोलीचे सुंदर प्रतिबिंब दिसते. बोलीभाषेत आलेले 'पडाव' (शीड असणारी होडी), 'रांध्या' (स्वयंपाकी) आणि विहिरीतून पाणी काढण्याचा 'पोहरा' या शब्दांचा त्यांनी केलेला वापर त्यांच्या भाषिक समृद्धीची साक्ष देतो.

साहित्यातील 'आत्मचरित्र' हा प्रकार माणसाला स्वतःचा भूतकाळ प्रामाणिकपणे मांडायला शिकवतो. रामशेठ यांच्या संपूर्ण भाषणात एक उत्तम आत्मकथनात्मक ओघ आहे. आत्मचरित्राची पारदर्शक लेखनशैली त्यांची आहे. "लोकांनी रामशेठ बनवलं, पण मी मनानं अजून रामशेठ झालेलो नाही," ही भावना एका निगर्वी लेखकाचीच असू शकते. खाडीत उतरून श्वास कोंडत वाळू उपसणे, आठ आणे मजुरीवर रांध्या म्हणून काम करणे आणि आईसोबत पाण्याचे हंडे वाहणे हा संघर्ष त्यांनी ज्या ताकदीने मांडला आहे, ती एक उत्कृष्ट कथात्मक मांडणी आहे. उत्कृष्ट साहित्यात 'संघर्ष' आणि 'नाट्यमयता' केंद्रस्थानी असते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी १९८४च्या शेतकरी आंदोलनाचे केलेले वर्णन एखाद्या कादंबरीतील थरारक प्रसंगासारखे किंवा 'भाऊसाहेबांच्या बखरी'तील वर्णनासारखे वाटते. पोलिसांच्या समोर उभे ठाकणे, रातोरात जंगलात भूमिगत होणे हा सगळा प्रसंग त्यांनी अत्यंत दृश्यमान पद्धतीने मांडला आहे. वाचकाच्या किंवा ऐकणाऱ्याच्या डोळ्यांसमोर हा प्रसंग जिवंत होतो हे साहित्याचेच एक प्रमुख वैशिष्ट्य आहे.

साहित्य माणसाला संवेदनशीलता आणि मूल्ये शिकवते. राजकारणात एकमेकांचे विरोधक असूनही वरिष्ठांबद्दल असणारा आदर लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नेहमीच जपला. हे साहित्यातून मिळणाऱ्या सुसंस्कृत संस्कारांशिवाय शक्य नाही. 'पराभवाचे राजकारण' आणि 'नात्यांमधील ऋणानुबंध' यातील फरक ते एका विचारवंतासारखा मांडतात. ते केवळ साहित्याचे विद्यार्थी नव्हते, तर काव्याचे मर्म जाणणारे रसिक आहेत. भाषणात ऐनवेळी त्यांनी केशवसुतांच्या "एक तुतारी द्या मज आणून, फुंकेन जी मी स्वप्राणाने!" या ओळींचा उल्लेख केला, तेव्हा त्यांची साहित्याशी असलेली नाळ स्पष्ट होते. समाजाला दिशा देण्याचे काम साहित्यिक करतात हा त्यांचा विचार साहित्यावरील पराकोटीच्या निष्ठेतून येतो.

साहित्याची केवळ कोरडी स्तुती न करता कोकण मराठी साहित्य परिषदेला २५ लाख रुपयांची देणगी जाहीर करणे आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरवण्याची १०० टक्के तयारी दर्शवणे यावरून लोकनेते रामशेठ ठाकूर यांची साहित्याप्रति असलेली कृतज्ञता आणि योगदान सिद्ध होते. जरी ते नंतरच्या काळात 'दगड आणि मातीच्या' म्हणजेच बांधकाम व्यवसायात आणि राजकारणात व्यग्र झाले, तरी त्यांच्या मनाच्या कोपऱ्यात दडलेला 'मराठीचा प्राध्यापक' आणि 'साहित्यिक' कधीच लुप्त झाला नाही. त्यांच्या भाषणातील ओघ, भावनिक गुंतवणूक, शब्दांची निवड आणि साहित्याबद्दलचा आदर हेच सिद्ध करतो की ते वृत्तीने एक सच्चे साहित्यिक आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या भाषणाचे सूक्ष्म निरीक्षण केले, तर त्यात 'मूल्यविचार' आणि 'साहित्याची वैशिष्ट्ये' यांचा एक अत्यंत सुंदर मिलाफ दिसून येतो. साहित्य हे केवळ पुस्तकात नसते, तर ते माणसाच्या संस्कारात आणि जगण्यात कसे उतरते, याचे हे भाषण एक जिवंत उदाहरण आहे. साहित्याचा अंतिम उद्देश माणसाला सुसंस्कृत बनवणे आणि त्याच्यात मूल्यांची जपणूक करणे हा असतो. रामशेठ यांच्या संपूर्ण प्रवासात मूल्यांना खूप महत्त्व आहे. म्हणूनच ते जाणीव असलेले लेखक आणि वक्ते आहेत. सुधा मूर्ती लिहितात तेव्हा त्यांचे कौतुक होते; परंतु रामशेठ जे बोलतात ते लेखन एकत्र केले आणि त्यांचे हृदय उचंबळून आले, तर साहित्यिक पुरस्कार देण्यापेक्षाही खूप उंच लेखन कर्तृत्व त्यांचे सिद्ध होईल. वाढदिवसानिमित्त त्यांना हार्दिक शुभेच्छा!

**-प्रा. डॉ. सुभाष वाघमारे,**
**प्रभारी संचालक, भाषा मंडळ,**
**कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा**

# सर्वसामान्यांचा आधारवड




आपल्या स्वकर्तृत्वाने महाराष्ट्रात शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, व्यावसायिक अशा विविध क्षेत्रांत शून्यातून विश्व निर्माण करणारे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे कर्मवीर अण्णांच्या संस्काराने व विचाराने भारावलेले व्यक्तिमत्त्व आहे.

महाराष्ट्रातील एक आगळेवेगळे आणि दानशूर व्यक्तिमत्त्व २ जून १९५१ रोजी एका सर्वसामान्य कुटुंबात जन्म झालेले राम चांगू ठाकूर हे केवळ कुटुंबाचे राम न राहता आपल्या एकूणच कार्यामुळे ते संपूर्ण महाराष्ट्राचे रामशेठ झाले. रायगड भूमीतून उदयास आलेले हे नाव म्हणजे तळागाळातील जनतेच्या विकासाचे, सामाजिक बांधिलकीचे आणि विश्वासाचे सर्वमान्य प्रतीक आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड व छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे प्रबंधक म्हणून काम करीत असताना एवढ्या मोठ्या माणसाशी प्रशासकीय काम करताना जवळून माझा संबंध आला आणि त्यातूनच साहेबांशी भावनिक नाते तयार झाले.

शैक्षणिक क्षेत्रात आशिया खंडात अग्रेसर आणि तळागाळातील वाडी-वस्तीपर्यंत पोहचलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमधून रामशेठ ठाकूर यांनी १९६८ ते १९७२ या काळात आपले शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर बीएड् केले आणि शिक्षक म्हणून नोकरीचा मार्ग स्वीकारला, पण नियतीच्या मनात काहीतरी वेगळे असावे म्हणूनच की काय ते १९७६ साली व्यवसायामध्ये उतरले. जिद्द, चिकाटी, परिश्रम आणि संयम याच्या जोरावर ते स्वकर्तृत्वाने सर्वोच्च स्थानी पोहचले. ज्या रयत शिक्षण संस्थेत ते शिकले, त्याच संस्थेचे ते मॅनेजिंग कौन्सिल सदस्य म्हणून अनेक वर्षे कार्यरत आहेत ही गोष्ट भाग्याचीच!

अगदी साध्या कुटुंबातून पुढे येत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर समाजात मानाचे स्थान निर्माण केले. ठाकूरसाहेबांनी जीवनातील उंच उंच ध्येय प्राप्त करताना ते कधीही थकलेले वाटले नाहीत, आजही ते तितक्याच ताकदीने काम करताना दिसतात. त्यांच्या नेतृत्वात लोकहिताची जाणीव आणि कार्यात सातत्य दिसून येते. ते ज्येष्ठ राजकारणी, माजी खासदार, प्रसिद्ध दानशूर व्यक्तिमत्त्व आहेत. रायगड जिल्ह्यात विशेषतः पनवेल परिसरात त्यांची विशेष ओळख असली तरी एक दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून आता त्यांची ओळख संपूर्ण महाराष्ट्रभर घराघरात पोहचलेली दिसून येते.

प्रारंभी समाजकारणात अग्रेसर असणारे लोकनेते रामशेठ ठाकूर लोकाग्रहास्तव राजकारणात उतरले आणि दोनदा लोकसभेचे खासदार झाले. आता त्यांचा राजकीय वारसा त्यांचे मोठे चिरंजीव आमदार प्रशांत ठाकूर मोठ्या नेटाने पुढे चालवीत आहेत. ते पनवेल मतदारसंघाचे आमदार आहेत, तर दुसरे पुत्र परेश ठाकूर हे पनवेल महापालिकेचे नगरसेवक आहेत. दोघेही ठाकूरसाहेबांचा सामाजिक, राजकीय वारसा समर्थपणे सांभाळत आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी राजकारणाला केवळ सत्तेचे साधन न मानता जनसेवेचे माध्यम मानले. पनवेल व रायगड परिसरातील रस्ते, वीज, पाणीपुरवठा, शैक्षणिक संस्था, क्रीडा यांसारख्या अनेक सोयीसुविधा प्रत्यक्ष लोकांपर्यंत पोहचवताना विकासकामांतून कार्याचा ठसा उमटवला. सर्वसामान्यांच्या समस्या ऐकून त्यावर कृती करणे ही त्यांची कामाची पद्धत लोकांना आपलीशी वाटते.

शिक्षण क्षेत्रात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उभारलेल्या विविधांगी उपक्रमांमुळे व दिलेल्या आर्थिक ताकदीमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. ठाकूरसाहेब आणि रयत शिक्षण संस्थेचे भावनिक नाते आहे. संस्थेचे एक माजी विद्यार्थी खूप मोठे उद्योजक झाले असले तरी ते आपल्या संस्थेला व छत्रपती शिवाजी कॉलेजला विसरले नाहीत. मातृसंस्था म्हणून ते 'रयत'ला पहिली पसंती देतात.

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांची आयुष्यभर जपवणूक करताना लोकनेते रामशेठ ठाकूर आवर्जून दिसतात. त्यांनी आतापर्यंत रयत शिक्षण संस्थेला जवळजवळ १०० कोटी रुपयांची देणगी दिली याबद्दल ९ मे २०२६ रोजी कर्मवीर अण्णांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाच्या निमित्ताने खासदार शरदचंद्र पवारसाहेब यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांचा सपत्नीक सत्कार केला, ही गोष्ट कौतुकाची व आदरास पात्र ठरणारी आहे.

जवळजवळ ७५ वर्षांच्या प्रवासात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना दिलेले प्रोत्साहन समाजजीवन अधिक समृद्ध करणारे ठरले. त्यांच्या दानशूर व्यक्तिमत्त्वातून नव्या पिढीला प्रेरणेचा मार्ग मिळत आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साधेपणा, निर्मळपणा, जिद्द आणि प्रामाणिकपणा यांचा सहज सुंदर संगम एकवटला आहे. म्हणूनच 'लोकनेते', 'दानशूर' या उपाध्या त्यांच्या कार्याची ओळख करून देतात. त्यांचे जीवनकार्य हे संघर्षातून यशाकडे जाणाऱ्या प्रवासाचे प्रेरणादायी दुर्मीळ उदाहरण आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो हीच प्रार्थना!

**-डॉ.अरुणकुमार सकटे,**
**प्रबंधक, सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालय, कराड**



# कर्मयोगी... एक अखंड प्रवास

नमस्कार वाचकहो, सामान्यातला असामान्य असा कोण? हा प्रश्न विचारला की, डोळ्यासमोर पटकन एक नाव येतं ते म्हणजे आपल्या सर्वांचे लाडके लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेबांचं. अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांच्यावर प्रेम करणारे ज्ञात-अज्ञात कितीतरी जण ज्यांनी त्यांच्यासाठी काय करता येईल याचा विचार सुरू केला. अनेकांनी वेगवेगळे प्रयोग करूनही पाहिले. मग प्रश्न पडला की आपण काय करू शकतो? एक असं व्यक्तिमत्त्व ज्याच्याकडे असामान्य गुण आहेत त्या गुणांचा आपल्या विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, पालकांना तसेच पनवेलवासीयांना काही उपयोग होईल, त्यांच्या गुणांची शिदोरी या सर्वांपर्यंत पोहचवता येईल का?. त्यातच आमचं वार्षिक स्नेहसंमेलन आलं, मग ठरवलं साहेबांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांच्या जीवनावर आधारित कार्यक्रम करायचा.

यामागे हेतू एवढाच होता की त्यांच्या जीवन कार्यात त्यांना मिळालेलं यश हे सहजासहजी मिळालेले नाही. त्यामागे त्यांची अपार मेहनत, कष्ट, परिश्रम, सेवाभावी वृत्ती, लोकांवर असलेलं त्यांचं प्रेम, समाजऋण, मातृऋण या सगळ्यातून ताऊन, सुलाखून निघालेलं बावनकशी सोन्यासारख्या व्यक्तित्त्वाचा एखादा गुण तरी आपल्यापर्यंत पोहचला पाहिजे या हेतूने विचार करू लागले. बघता बघता विचार पक्का झाला आणि मग गाण्यांची निवड झाली. गाणी निवडत असतानाही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेशी गाणी मिळाली पाहिजेत हा विचार होताच, पण सुदैवानं ती समस्या दूर झाली. आता या कार्यक्रमासाठी नाव काय ठेवावं यावर विचारमंथन सुरू झालं. खूप प्रयत्नानंतर एक नाव समोर आलं आणि ते होतं 'कर्मयोगी.' मुळात या शब्दाचा अर्थच असा आहे की जो कोणत्याही फळाची अपेक्षा न करता आपलं काम करत राहतो. त्याला कर्मयोगी म्हणतात. मग यापेक्षा वेगळी ओळख रामशेठ ठाकूरसाहेबांची असूच शकत नाही. ठरलं तर! 'कर्मयोगी... एक अखंड प्रवास' हे नाव दिलं गेलं.

न्हावाखाडीत वाढत असणारा एक सर्वसामान्य मुलगा, जो मेहनतीने भविष्यात असामान्य लोकनेता बनला. याच विषयावर आम्ही चर्चा करत असताना समोर समृद्ध विचारांचे व्यक्तिमत्त्व बसलं होतं ते म्हणजे आपल्या सर्वांचे लाडके रामशेठसाहेब... "आठवणींच्या ही आधी जाते जिथे मनाचे निळे पाखरू गावाकडचे घर कौलारू" या काव्यपंक्तींप्रमाणे ते आपल्या भूतकाळात गेले. त्यानंतरचा अर्धा तास आम्ही फक्त मंत्रमुग्ध होऊन गेलो. जीवाचे कान करून फक्त ऐकत होतो. आज मला तो प्रसंग सांगण्याची संधी मिळत आहे. त्यांनी सांगण्यास सुरुवात केली. ते म्हणाले, लहानपणी मी माझ्या आईला कामात मदत करत होतोच, तीही माझ्यावर मायेची पाखर घालत होती. आतासारखी त्यावेळेला कोणतीही भौतिक साधने काही उपलब्ध नव्हती. म्हणजे साध्या साध्या गोष्टीसुद्धा स्वतःच स्वतःला मिळवाव्या लागत होत्या.

त्यांनी पुढे सांगितलं... शिक्षणासाठी आग्रही असणारे माझे वडील मला शिक्षणासाठी वेगवेगळ्या गावात घेऊन गेले. माझी आई अपार कष्ट करायची, वडीलही मेहनत करत होते. फारसा सुकाळ नसलेला तो भाग होता. या भागात पावसाच्या, निसर्गाच्या अडचणी तर येतच होत्या. याव्यतिरिक्त आर्थिक अडचणीही होत्याच, मात्र त्या सगळ्यावर मात कशी करायची हे मी आईवडिलांकडे बघूनच शिकत होतो. मी लाकडं फोडायच्या कामाला आईसोबत तर जातच होतो, अरे हो मी माझ्या आईला "आयव" असं म्हणायचो बरं का... माझ्या आयवकडून मी मेहनत शिकत होतो. तिचे श्रम थोडे कमी व्हावेत म्हणून मी तिला मदत करायचो. एकदा अचानकच मला असं कळलं की पनवेल-उरण रेल्वेमार्गांवर काम आहे. मग काय मी कोणताही विचार केला नाही आणि त्या कामावर गेलो. सकाळपासून संध्याकाळपर्यंत उन्हातान्हात तिथं काम केलं आणि निघताना माझ्या हातावर अवघा एक रुपया पडला, पण तो एक रुपया माझ्यासाठी लाखमोलाचा होता. घरी आल्यानंतर मी तो एक रुपया माझ्या आयवच्या हातावर ठेवला आणि त्यावेळेला माझ्या आयवच्या डोळ्यांत पाणी तरळलं. माझा एवढासा राम... कष्टाने मेहनतीने पैसे कमवून आला. याहीपेक्षा माझा राम मोठा झाला... अशी काहीशी भावना तिच्या मनात बहुदा आली असावी. प्रत्येक मुलाचं आपल्या आईशी काहीतरी वेगळंच नातं असतं. अगदी तसंच माझंही माझ्या आयवशी एक वेगळंच नातं होतं. माझ्या आईनं माझ्यावर संस्कार केले, मला घडवलं. शिक्षण थांबवू नकोस, शिक्षण पूर्णच करायचं हा तिचा ध्यास होता.

मी जेव्हा व्यवसायात उतरलो त्यावेळेलाही माझ्या रामनं असं केलं, माझ्या रामनं तसं केलं, असं आयव अभिमानाने सांगायची आणि ती सांगत असताना ऐकून माझे कान तृप्त व्हायचे, मला जग जिंकल्याची अनुभूती यायची. असं वाटायचं की माझ्या आईला माझा अभिमान वाटतोय यातच माझ्या जीवनाचं सार्थक झालं. मी जेव्हा साताऱ्याला जायला निघालो त्यावेळी माझ्या आयवनं नकळतपणे पदरानं आपले डोळे टिपले. आता आपल्या मुलाचं कसं होणार, आपल्या मुलाला तिकडं कसं काय नीट खायला मिळणार या काळजीपोटी आयवच्या डोळ्यातलं पाणी थांबतच नव्हतं. तिच्या डोळ्याला पाण्याची धार लागली होती. ते बघून क्षणभर मीही विरघळून गेलो, मात्र पुढे शिकायचंय, आपल्याला मोठ व्हायचंय, आपल्या आयवला आपण काहीतरी बनलेलं दाखवायचंय असा निश्चय परत त्याच मनात आला आणि आयवलाही यापेक्षा काय वेगळं हवं होतं. म्हणून तिचा धरलेला घट्ट हात मी हळूच सोडला, तिला वाकून नमस्कार केला. तिने प्रेमाने जवळ घेतलं, माझ्या डोक्यावरून, पाठीवरून हात फिरवला, मला भरभरून आशीर्वाद दिला आणि "राम कालजी घे हा" असं सांगून तिने मला निरोप दिला. ज्यावेळी मी परतलो त्यावेळेला तिला कोण आनंद झाला की माझा राम आता शिकला... आयवचं स्वप्न पूर्ण करण्याची संधी मला भगवंताने दिली यातच मी स्वतःला धन्य मानतो.


जसं चंदनाच्या झाडाच्या संगतीत एखादं साधसं झाड जरी आलं तरी त्याच्या फांद्यांना चंदनाचा सुवास लागतो. अगदी त्याचप्रमाणे रामशेठ सरांच्या सानिध्यात जे जे कोणी येतात ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने भारावून जातात आणि त्यांच्यातला एकतरी गुण त्यांच्याकडे आला तर त्यांचं व्यक्तिमत्त्वसुद्धा तितकंच बहरून निघतं आणि हा माझा वैयक्तिक अनुभव आहे. त्यांच्याबद्दल लिहीत असताना मी इतकीच मनोकामना करते की त्यांना दीर्घायुष्य लाभो... वटवृक्षाप्रमाणे लाखो झाडांना सावली देणाऱ्या या कर्मयोगी व्यक्तिमत्त्वाला मनस्वी वंदन!

**-स्वप्नाली म्हात्रे, प्राचार्य, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, कामोठे**



माजी खासदार,
लोकनेते
मा.श्री.
रामशेठ
ठाकूर
आपणांस
02 जून
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
75 अमृत महोत्सवी वर्ष
शुभेच्छुक
श्री. समिर मदन केणी
अध्यक्ष, वडघर पंचायत
समिती विभाग
(मु. चिंचपाडा, पो. पनवेल, ता. पनवेल)


02 जून
रायगडातील दानशूर व्यक्तिमत्व!
माजी खासदार, लोकनेते
मा.श्री.
रामशेठ
ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
CCB
Mr. Chandrakant Bhoir
+91 98332 33315
Mr. Vishal Bhoir
+91 87793 96970
M/s. CHANDRAKANT C. Bhoir
Government Registered Contractors,
Earth Movers, Transport & Civil Contractors
At & Post - Nhava, Tal. Panvel, Dist. Raigad,
Navi Mumbai - 410 206.vishalbhoir11@gmail.com


माजी खासदार, लोकनेते
मा.श्री.
रामशेठ
ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
विघ्नेश
एंटरप्राइजेज


रायगडातील दानशूर व्यक्तिमत्व!
माजी खासदार, लोकनेते
मा.श्री.
रामशेठ
ठाकूर
साहेब, आपणांस
या जन्मदिनी
दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
के. अे. म्हात्रे
M/S. RAJ CONTRACTOR & ENGINEERS
Builders & Suppliers
At Dapoli, Post. Pargaon, Tal. Panvel, Pargaon, Tal. Panvel, Dist. Raigad



अगणित माणसे या
जगात जन्मास येतात,
पण तुमच्यासारखे
यशस्वी व्यक्तिमत्त्व
एखादंच जन्मास येतं...
माजी खासदार, लोकनेते
आदरणीय
रामशेठ
ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
HP
गौरव अजय कांडपिळे
युवा नेते
अजय यशवंत कांडपिळे
मा. नगरसेवक पनवेल,
मा. चेअरमन पनवेल को ऑप अर्बन बँक
BHARATI AUTO
CARE CENTRE
(Dealers of Hindustan Petroleum Corporation Limited)
Address: HP Petrol Pump, Survey No. 29/C, 30/0, Palidevad,
Sukapur, Panvel, Raigad, Maharashtra 410206.
Email: bhartiautocare@gmail.com | gauravkandpile@yahoo.in


रायगडातील दानशूर व्यक्तिमत्व!
माजी खासदार, लोकनेते
मा.श्री.
रामशेठ
ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. भुपेंद्र पाटील
उपसभापती,
पनवेल पंचायत समिती


02 जून
अगणित माणसे या जगात जन्मास येतात,
पण तुमच्यासारखे यशस्वी व्यक्तिमत्त्व एखादंच जन्मास येतं...
लोकनेते
माजी खासदार
मा. श्री.
रामशेठ
ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
हरिश्चंद्र म्हात्रे
माजी सरपंच,
न्हावे ग्रामपंचायत (ता. पनवेल)


रायगडातील दानशूर व्यक्तिमत्व!
माजी खासदार, लोकनेते
मा.श्री.
रामशेठ
ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
SAI
PRINTERS
innovative printing brilliant result
शुभेच्छुक
Print WORLD
•print•copy•design•digital
Mob. No.: 9987291017/9773361003/8082082082/9870370307
Off. 1: At. Kopar, Post. Gavhan, Tal. Panvel, Dist Raigad.
Off. 2: 401, NMS Icon, Plot No. 194, Sector-19, Ulwe, Navi Mumbai.
Email: sai.printers15@gmail.com/printworld.ulwe@gmail.com



Purohit Clinic
Accident & Maternity Home
Dr. Deepak Purohit
M.S. (Orthopaedic)
NABH accredited, ISO certified Nursing home
Treating Patients from 1986
Well equipped hospital for trauma care & orthopaedics.
Knee & Shoulder Arthroscopy
Hip Replacement, Knee Replacement Surgeries.
Spine Surgery
Major Fractures & Disabilities
Obstetrics & Gynaecology
Infertility, Laparoscopy
State of Art Operation Theatres with modular & complete stainless Steel Opration Theatre
On panel of all major insurance providers
Fully equipped Physiotherapy Unit
Digital & Portable X-Ray Units
Dr. Veena Purohit
M.D. (Gynacologist)
Purohit Clinic
Accident & Maternity Home
Dr. Mandar Purohit
M.S. (Orthopaedic)
Cataract Surgery
Computerized eye testing
Diabetic Eye Care
Retina Clinic
Glaucoma treatment
Squint surgery
Cornea Clinic
Pterygium surgery
Contact Lens Clinic
Joint Replacement
Arthroscopy
Fractures & Accidents
Back Pain
Spine surgery
Physiotherapy
Digital X-Rays
Dr. Deepti Purohit
M.S. (Ophthalmalogist)
PUROHIT CLINIC: Plot 78, MCCH Society, PANVEL - 410 206
022-2745 2922/2745 0501 Cell: +91 84220 24807 email: purohitclinic@gmail.com
PUROHIT HOSPITAL: Sec. 16, Above Federal Bank, Kamothe - 410 206.
022-2743 0659 Cell: +91 98197 50771/94226 19424 email: deeptiparanjpe912@gmail.com
We treat with care & compassion...



WISHING YOU MANY MORE YEARS IN YOUR MISSION TO CHANGE LIVES.
Happy Birthday
SHRI. RAMSHETH THAKURJI
(Ex. MP)
With Best Wishes From
NIPPON PAINT
Inspired by you
NIPPON PAINT INDIA PVT. LTD.
Survey No.6 – 22, Taloja – Ambernath Road,
Ghot Camp, Ghotchal, Taloja,
City: Panvel, Dist: Raigad, Maharashtra.





02 जून
माजी खासदार, लोकनेते
मा.श्री.
रामशेठ ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
लोकनेता
WITH BEST COMPLIMENTS FROM
AIS
Asahi India
Glass Ltd.

तुमचे नेतृत्व
संघर्षाचे, स्थानिकांचे, प्रकल्पग्रस्तांचे
आणि जनहिताचे...
माजी खासदार, लोकनेते
आदरणीय
श्री.
रामशेठ ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक
शुभेच्छा!
75 अमृत महोत्सवी वर्ष
शुभेच्छुक
M. P. GROUP
BUILDERS & DEVELOPERS





WISHING YOU MANY MORE YEARS IN YOUR MISSION TO CHANGE LIVES.
02 June
Happy Birthday
SHRI. RAMSHETH THAKURJI (Ex. MP)
SAMARTH
(Prabhu Ali, Panvel)
GANESH KRUPA
(Opp. Nadkarni Hospital, Panvel)
JANKI
(S. N. Road, Panvel)
SHRADDHA
(Natyagriha Road, Panvel)
SNEHSHREE
(Natyagriha Road, Panvel)
+91-99304 99909
+91-99304 99099
+91-80802 57175
+91-80808 65909
NEELKANTH GROUP
O: Neelkanth Group, Office No. 706-710, 7th Floor, Neelkanth Landmark, Plot No. 365/1/2,
Mumbai - Pune Highway, Behind Orion Mall, Panvel - 410206.
E Mail : neelkanthassociates9099@gmail.com | neelkanthconstructions.group@gmail.com





The project has been registered via MahaRERA registration number: Aster: P52000055662, Jasmine: P52000055578, and is available on the website https://maharera.mahaonline.gov.in under registered projects. PDPL/ developer secures a credit facility from ICICI Bank and Aditya Birla Finance Limited (collectively, "Lenders"), with Beacon Trusteeship Limited as Security Trustee. This facility is for the development projects at Sector B, Golden Willows ("RZ-02") and Sector D ("RZ-05"). The developer has fully repaid the previous loan managed by Axis Trustee Services Limited for Axis Bank, State Bank of India, and Punjab National Bank Housing Finance Ltd. Upon sale of individual flats in the Projects, Beacon Trusteeship Limited will issue the requisite Release of Charge (ROC) or No Objection Certificate (NOC). The said amenities are proposed to be completed by 2032-33.*T&C Apply


PRACHIN
HEALTHCARE
MULTI-SPECIALITY
HOSPITAL
"NEW STEPS FOR EVERY
GENERATIONS
PIONEERING THE NEXT
ERA OF CARE"
PRACHIN
Healthcare
Best wishes on your Birthday.
Wishing you another year of great accomplishments!
Happy Birthday,
Shree. Ramshethji Thakur (Ex-MP)
PRACHIN EMBRION IVF CENTER
Dr. Sangeeta M. Dake.
M.D.D.G.O. ( Sion Hospital )
IVF Specialist
JOINT REPLACEMENT CENTER
Dr. Mangesh R. Dake.
MS - Orthopaedics ( K E M Hospital )
( Arthroscopic , Trauma &
Joint Replacement Surgeon )
Address
Plot No.69/2, Behind Hotel Garden, HOC Colony, Panvel - 410206
CONTACT NO. +91 22 71333258 / 59 | EMERGENCY. +91 96191 83258
Web : prachinhealthcare.com | Email : info@prachealthcare.com


रायगडातील दानशूर व्यक्तिमत्व!
माजी खासदार, लोकनेते
मा.श्री.
रामशेठ
ठाकूर
आपणांस
अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त
अनंत शुभेच्छा !
02 जून
OAK
MEDICARE & DIAGNOSTICS
WITH BEST COMPLIMENTS
Dr. Sanjiv S. Kale
M.B.B.S | M.D (Psychiatry)
Consultant in Mental Illness & Sexologist
Dr. Aditya C. Oak
M.B.B.S | Ms (General Surgery) FMAS
Consultant Laparoscopic Surgeon
Dr. Maya S. Kale
M.B.B.S | DVD (Skin, Hair & Nail)
Consultant Dermatologist
Dr. Kavita Kale Oak
M.B.B.S | M.D (Pathology)
Consultant Pathologist
7045 525 525
Manovikas Kendra & Skin Care Clinic
134, Raje Complex, 1st floor,
Above Axis Bank,
Opp. Chhatrapati Shivaji Maharaj Statue,
Panvel 410206
OAK Medicare And Diagnostics
Old Kale Hospital, Ashirwad Building,
Vadale Talav Road, Opp. V K High School,
Panvel 410206


02 जून
75 अमृत महोत्सवी वर्ष
माजी खासदार,
लोकनेते
मा.श्री.
रामशेठ
ठाकूर
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
tpv
Cement & other construction materials
TPV SALES LTD.
FORMERLY THAKKAR POPATLAL VELJI SALES LTD.
+91 9833367777 / 022-27453446 www.tpvindia.com
Tulsi Pooja, Office no.2, 1st floor, Sector - 1,
Plot 5 & 7, New Panvel (E) 410206, Maharashtra, India.


02 June
Happy Birthday,
Shree. Ramshethji Thakur (Ex-MP)
Best wishes on your Birthday.
Wishing you another year
of great accomplishments!
With Best Wishes From
SHREEYASH MATERNITY AND GENERAL HOSPITAL
ORTHOPEDIC TRAUMA AND JOINT REPLACEMENT CENTER
Paediatric Neurology Clinic
State of art infrastructure
& equipments
• Fully equipped operation theatres , labor rooms
• Obstetric ultrasonography
• Laparoscopic Gynecological surgeries
• Gynecological oncosurgery
• Fertility treatment
• Pediatric Neurology Consultation
DR RAVINDRA INAMDAR
MD (OBGY)
DR MADHURI INAMDAR
MD,DGO (OBGY)
DR RAMA INAMDAR KULKARNI
DNB (OBGY)
Gynaec Laproscopic Surgery
Fellowship (Seoul, Korea)
DR NEHA INAMDAR PATKI
MBBS, DNB Paediatrics,
Fellowship In Pediatric Neurology,
Hinduja Hosp, Mumbai
COMPREHENSIVE ORTHOPAEDIC TRAUMA, SPINE, JOINT REPLACEMENT
AND ARTHROSCOPY CENTRE
DR SOURABH KULKARNI
MS Ortho (KEM Hospital)
Fellow Joint Replacement Surgery (Korea)
Advanced Hip & Knee Surgery Fellow (SICOT)
DR SARANG PATKI
MS Ortho (JIPMER),DNB Ortho
Fellow Arthroscopy , Knee &
Shoulder Surgery (Italy)(ISAKOS)
Next To Bank Of India, Vijay Marg, Sector 19, New Panvel East, Navi Mumbai,
Maharashtra 410206, contact no: 27452139, 27451411











पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मल्हार नेटवर्क प्रा. लि.च्या वतीने अभीष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते. दैनिक रामप्रहरच्या कार्यालयात हा सोहळा अत्यंत उत्साही आणि भारावलेल्या वातावरणात झाला. त्याची ही छायाचित्रमय झलक.














# दातृत्व, नेतृत्व आणि कर्तृत्वाचा त्रिवेणी संगम



थोर शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा वारसा महाराष्ट्रात समृद्ध करणारे त्यांचे खरे वारसदार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आहेत. पनवेल, उरण पंचक्रोशीसह रायगड जिल्ह्यात सामाजिक, शैक्षणिक, उद्योग आणि राजकीय आदी क्षेत्रात चौफेर कामगिरी करणारा एक लोकनेता असा ज्यांचा आवर्जून उल्लेख करता येईल असे व्यक्तिमत्त्व म्हणजे 'रयत'मित्र रामशेठ ठाकूर! त्यांच्याबद्दल बोलताना दातृत्व, नेतृत्व आणि कर्तृत्वाचा त्रिवेणी संगम असणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व असे शब्द आपसूक उच्चारले जातात.

समाजकारण, राजकारण, उद्योग व्यवसाय, शिक्षण आदी क्षेत्रांची यशस्वी सांगड घालून अनोखी आणि वैविध्यपूर्ण जीवनशैली स्वीकारणारा तसेच मानवी मूल्यांवर निष्ठा व नितांत श्रद्धा असणारा गोरगरीब, उपेक्षित बहुजनांच्या मदतीला धावून येणारा प्रबळ इच्छाशक्तीचा धुरंधर लोकनेता अशी त्यांची सर्वदूर ख्याती व स्वच्छ प्रतिमा आहे. अशा लोकनेत्यास अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना मनस्वी आनंद होत आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उद्योग, राजकारण, समाजकारण आणि शिक्षण क्षेत्रांमध्ये उत्तुंग कारकीर्द सर्वश्रुत आहेच. दातृत्वाच्या परिसीमा या बहुश्रुत व्यक्तिमत्त्वाने कधीच ओलांडल्या आहेत. त्यांच्या या चौफेर कर्तृत्वाची भुरळ भल्याभल्यांना प्रभावित करते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वातील त्यांचा शैक्षणिक क्षेत्रामधील लीलया वावर आणि अतीव ध्येयासक्ती नेहमीच अचंबित करणारी वाटते. त्यांच्या आयुष्याच्या जडणघडणीमध्ये अत्यंत महत्त्वाच्या पैलूंपैकी शिक्षण आणि बहुजनांना शिक्षित करण्यासाठी त्यांची धडपड हा पैलू खास वाखाणण्याजोगा आहे.

खरंतर आपल्या परिसरातील सर्वसामान्य बहुजनांचे शैक्षणिक पुनरूत्थान करून त्यांना सुशिक्षित करणे हा त्यांचा स्थायीभावच आहे. म्हणूनच शैक्षणिक क्षेत्रामध्ये त्यांचे प्रामाणिक व अत्यंत भरीव योगदान वेगळेपण अधोरेखित करते.

देशाच्या संसदेमध्ये रायगड जिल्ह्याचे दोन वेळा प्रतिनिधित्व करूनही सध्या सक्रिय राजकारणात त्यांची प्रासंगिक कृतीशिलता अचंबित करणारी आहे. राजकारणातल्या ऐन उमेदीच्या काळात त्यांनी वयाच्या ५१व्या वर्षी कुठलीही निवडणूक न लढविण्याचा घेतलेला निर्णयदेखील अचंबित करणारा ठरला. त्याचे कारण म्हणजे त्यांना आपले सर्वस्व शैक्षणिक क्षेत्रामध्ये झोकून द्यायचे होते आणि म्हणूनच शिक्षण क्षेत्रामध्ये त्यांनी दिलेले योगदान हे केवळ भरीव नाही, तर आत्मानंदाची अनुभूती देणारा, आत्मोन्नतीचा त्यांनी स्वीकारलेला महामार्ग आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे मार्गदर्शक स्व. जनार्दन आत्माराम भगत या द्रष्ट्या नेत्याच्या नावाने स्थापन केलेली जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था ही स्वतःची शिक्षण संस्था, तीही मुंबई विद्यापीठ इलाख्यातली ख्यातकिर्द अशी शिक्षण संस्था यशाच्या उच्च शिखरावर असतानाही ज्या रयत शिक्षण संस्थेमध्ये 'कमवा व शिका' या योजनेत काम करून स्वतःचे शिक्षण पूर्ण केले त्या संस्थेच्या विकासात त्यांना अधिक रस अथवा कल दिसतो. कारण रयत शिक्षण संस्थेला ते आपली मातृसंस्था मानतात. रयत शिक्षण संस्थेवर त्यांचे अफाट आणि निरलस प्रेम आहे. या संस्थेला आजपावेतो १३० कोटी रुपयांपेक्षाही अधिक देणगी ठाकूरसाहेब यांनी स्वखुशीने दिली आहे आणि हा दातृत्वाचा ओघ मनोभावे अखंडपणे चालूच आहे.

याशिवाय रयत शिक्षण संस्थेच्या महाराष्ट्रातील अनेक शाळा व महाविद्यालयांना लाखात आणि कोटीत देणगी देऊन संस्थेबद्दलचे त्यांचे प्रेम आणि कृतज्ञता त्यांच्या कृतीतून निस्पृहपणे सिद्ध होते. त्यांच्या या दातृत्वाची तुलना करण्यासाठी महाराष्ट्रात एखादा दानवीर विरळच!

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था ही मुंबई विद्यापीठ इलाख्यातील अत्यंत नामांकित संस्था आहे आणि या संस्थेच्या स्थापनेमागील उद्देश म्हणजे ज्या भागात त्यांना स्वतःला माध्यमिक शिक्षणानंतर उच्च शिक्षण घ्यायची सुविधा नव्हती त्या आपल्या परिसरात भविष्यातील शैक्षणिक आव्हाने स्वीकारू शकतील असा प्रखर बुद्धिमत्तेचा विद्यार्थी विविध क्षेत्रांमध्ये पारंगत व्हावा या उद्देशाने त्यांनी मराठी, इंग्रजी माध्यमांच्या शाळा-महाविद्यालयांबरोबरच कायद्याचे शिक्षण देणारे महाविद्यालय सुरू केले.

शिक्षण हे व्यापारीकरण किंवा आर्थिक उत्पन्नाचाचा स्रोत म्हणून न पाहता आपल्या उद्योग व्यवसायातील अधिकांश वाटा शिक्षणासाठी खर्च करून शैक्षणिक पुनरुत्थान करण्याचा त्यांचा मानस हाच त्यांना खरे शिक्षण महर्षी ठरवतो. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक थोर शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील व त्यागमूर्ती लक्ष्मीवहिनी यांच्या उदात्त दान वृत्तीने ते आत्यंतिक प्रभावित असून त्यांच्या कार्याला पुढे नेण्यासाठी सदैव तत्पर राहणे ही इतिकर्तव्यताच ते मानतात. किंबहुना रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील आणि त्यांच्या सहचरणी रयतमाऊली लक्ष्मीबाई यांचा वारसा महाराष्ट्रात समृद्ध करण्यात सर्वात आघाडीवर असणारे व्यक्तित्त्व म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा प्रथम क्रमांक लागेल.

आपली मायभूमी, आपले गाव, आपली मातृसंस्था, ज्या शाळेत आपण शिक्षण घेतले ती शाळा, तो परिसर, ते वातावरण यांच्याशी तादात्म्य पावण्याची त्यांची वृत्ती त्यांच्याबद्दलच्या व्यक्तिमत्त्वाचे आकर्षण वाढवण्यात सतत प्रभावित करते. अशा या महान कर्मयोगी दानवीरास आणि जनतेच्या मनातील लोकनेत्यास, रयतेच्या संवर्धनासाठी समर्पित भावनेने कार्यरत असणाऱ्या या महान लोकनेत्यास आजच्या आधुनिक काळातला खरा शिक्षणमहर्षी म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

*औदार्याच्या दर्याला, नमन या दानसूर्याला!*
*तमा ना दुर्जनांची, संहारी क्रौर्याला!*
*काय वर्णू ही कीर्ती, वंदन तव कार्याला!*
*झेली कैक आव्हाने, जोड न तव धैर्याला!*
*निर्भीड विरक्त राम, प्रणाम तव शौर्याला!*

मोठ्या माणसांचा मोठेपणा, फुशारकी किंवा अहंकार या सगळ्या बाबींपासून रामशेठसाहेब कोसो दूर आहेत. अतिशय सामान्य जीवन जगणारा हा असामान्य महानायक वाटतो. त्यांच्या या कार्याबद्दल प्रभावित होऊन अनेक कार्यकर्ते रयतेवर प्रेम करत आहेत. ज्या शाळेत आपण शिकलो त्या शाळेवरचं त्यांचं प्रेम पाहून तर सर्वच अक्षरशः सद्गतीत होतात. या शाळेबद्दलची त्यांची निष्ठा व प्रेम अनोखे आहे. स्वतःच्या संस्थेच्या कोट्यवधी रुपयांच्या इमारती उभ्या आहेत. उलव्यामध्ये नुकतेच १०० कोटींपेक्षा अधिक रकमेची रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलसारखी भव्य शालेय वास्तू विस्तारित होत असलेल्या उलवे शहरातील विद्यार्थ्यांची भविष्यातील गरज ओळखून शिक्षणाची पूर्ती करण्यासाठी उभारण्यात आलेली डौलदार शालेय वास्तू दिमाखात उभी आहे. तरीदेखील संस्थेचा कोणताही अधिकारी, पदाधिकारी आल्यानंतर त्यांना आवर्जून आपल्या 'रयत'च्या गव्हाण शाखेत घेऊन येतात आणि या शाखेची इमारत, या शाखेत जिथे ते कौलारू वर्गखोलीत बसायचे ती जागा दाखवतात आणि आता ही संस्थेची शाखा व सर्व सुखसोयी, शैक्षणिक सुविधांयुक्त डौलदार वास्तू पाहुण्यांना फिरून दाखवताना त्यांचा उर अभिमानाने भरून येतो. असा रयतप्रेमी, रयतमित्र, रयतपुत्र अशा अनेक उपाधींनी ज्यांचा उल्लेख केला जातो त्या प्रत्यक्ष कर्मयोग्याला समक्ष पाहून धन्य वाटते. त्यांची पारखी नजर जबाबदार आणि प्रामाणिक कार्यकर्ता बरोबर हेरते.

साहित्य, कला, क्रीडा, अध्यात्म आणि सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांना रूची असते. ते स्वतः शिक्षकी पेशात होते. मराठी भाषेचा आणि संत साहित्याचाही त्यांचा अभ्यास दांडगा आहे. जगद्गुरू संत तुकारामांपासून अनेक संतांच्या रचना त्यांच्या मुखी अनेकदा येतात.

रयत शिक्षण संस्थेवर आणि एकूणच शिक्षण संस्कारावर विशुद्ध प्रेम करणाऱ्या या लोकनेत्याला आज त्यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त मानवंदना देऊन त्यांना दीर्घायुरारोग्य लाभो अशी सदिच्छा व्यक्त करतो. धन्यवाद! जय कर्मवीर!!

**–सागरकुमार रंधवे**, उपशिक्षक,
श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत
ज्युनिअर कॉलेज, गव्हाण, पनवेल

## रामशेठ ठाकूरसाहेब

*आपण एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व आहात साहेब!*
*माणसांना जोडण्यात कुशल आहात साहेब!*

*व्यक्तिशः विशेष योगदान तुमचे विविध क्षेत्रात*
*परोपकारी माणूस तुम्ही उत्तम आदर्श आहात*
*आदराचे स्थान मिळवणारे ऋषितुल्य पितामह*
*आपण एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व आहात साहेब!*

*पती या नात्याने पत्नीला योग्य साथ दिली*
*पिता, आजोबा नात्याने जबाबदारी पेलली*
*रयत शिक्षण संस्थेत तर तुम्ही पिढ्या घडवल्या*
*आपण एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व आहात साहेब!*

*रायगडचे सुप्रसिद्ध लोकप्रिय माजी खासदार तुम्ही*
*व्यवसायात कर्तृत्ववान, कर्तबगार तुम्ही*
*राजकारणात समाजकारण साधणारे सुधारक*
*आपण एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व आहात साहेब!*

*आजूबाजूचं राजकारण ढवळलेलं दिसतंय*
*तुम्ही मात्र समाजाचं हित मनापासून जपलंय*
*समतोल सांभाळणारे संयमी समाजधुरीण*
*आपण एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व आहात साहेब!*

*पुढील अनेक वर्षे लाभो तुम्हा उदंड आयुष्य*
*असाच तळपत राहो प्रकाशणारा हिरा वर्षानुवर्षे*
*साधेपण, निर्णायक, दानशूरत्व त्रिवेणी संगम*
*आपण एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व आहात साहेब!*

**– ॲड. माधुरी राजन थळकर, पनवेल**

# भावी पिढीला प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व



माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वकर्तृत्वाने शून्यातून विश्व निर्माण करून एक दानशूर, उद्योगपती व लोकनेता अशी ओळख निर्माण केली. शिक्षण, उद्योग, राजकारण, समाजकारण अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी आकाशाला गवसणी घातली, मात्र आजही पाय जमिनीवर ठेवून ते जीवनाची वाटचाल करीत आहेत. नैतिकता, कर्तव्य, परोपकार व कृतज्ञता या गुणांचा अंगीकार करणारे रामशेठ ठाकूर हे भावी पिढीला प्रेरणा देणारे लोकनेते आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे बालपण व विद्यार्थीजीवन कष्टमय गेले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कमवा आणि शिका या योजनेद्वारे उच्च शिक्षण घेऊन त्यांनी भूतकाळावर मात करून वर्तमानात मेहनत, प्रामाणिकपणा, ध्येयनिष्ठा आणि समोरच्या व्यक्तीचा आदर करणारा शालीन स्वभाव या सद्गुणांनी भविष्यकाळ उज्ज्वल केला. माणसाने आपले काम प्रामाणिकपणे केले तर यश मिळतेच, हा संदेश लोकनेते यांनी त्यांच्या जीवनशैलीतून दिला आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा स्वभाव शांत, नम्र, संयमी, संवेदनशील व आपलेपणा साधणारा आहे. या स्वभावामुळेच त्यांचा समोरच्या व्यक्तीवर प्रभाव पडतो आणि समोरची व्यक्तीही त्यांच्या स्नेहात पडते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भाषा मृदू व मधाळ, पण स्पष्टवक्तेपणाची आहे. दुसऱ्यांची मने दुखावतील अशा शब्दांचा वा भाषेचा वापर त्यांनी कधीच केला नाही. ते मीपणा, अहंकार, ईर्षा, क्रोध, मत्सर, द्वेष, स्वार्थ अशा षड्रिपुंपासून दूर राहणारे व्यक्तिमत्त्व आहेत.

राजकारणापेक्षा समाजकारणाला जास्त महत्त्व देत लोकनेते रामशेठ ठाकूर समाजोन्नतीसाठी शैक्षणिक संकुले उभारून शैक्षणिक सुविधा उपलब्ध केल्या. गरीब, गरजूंना मदतीचा हात दिला. असंख्य गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करून त्यांच्या पंखांना बळ दिले. गरजवंतांची गरज ओळखून त्यांना सढळ हस्ते मदत करणारे दानशूर नेते म्हणून ते महाराष्ट्रात ओळखले जातात. राजकारणात सामाजिक बांधिलकी जपणारे, सामान्य माणसांच्या सहवासात असणारे आणि लोकनेते असा लौकिक मिळविणारे रामशेठ ठाकूर सर्वार्थाने वेगळे आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रांत मोलाचे व लोकोपयोगी कार्य केले आहे. ज्या समाजाने आपल्याला मोठे केले, मानसन्मान केला, आदर केला त्या समाजासाठी आपल्या परीने आपण काहीतरी समाजोपयोगी कार्य करावयास पाहिजे अशी आपल्या वृत्तीतून व कार्यातून ते शिकवण देत आहेत. ही त्यांची शिकवण भावी पिढीला प्रेरणा देणारी आहे.

**–जितेंद्र घरत, माजी सरपंच**, चाणजे, उरण

# लढवय्या नेता

कर्तबगार माणसे ध्येयनिष्ठ असतात. भूतकाळाच्या आघाताने खचून न जाता वर्तमानकाळात कर्मयोगी महापुरुषांचा आदर्श घेऊन उज्ज्वल भविष्याचे यशोशिखर गाठण्यासाठी गरूडझेप घेतात. असेच यशोशिखरे सर करून समाजात आदराचे स्थान निर्माण करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर हे एक लढवय्ये आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आईवडील श्रद्धाळू होते. माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे असे संस्कार त्यांनी रामशेठ यांच्यावर केले. आज ते घडले आईवडिलांच्या संस्काराने.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा नम्र, शालीन स्वभाव, आपुलकी असलेली भाषा व समोरच्या व्यक्तीचा आदर, आपलेपणाची पद्धत या गुणांमुळे त्यांचा समोरच्या व्यक्तीवर प्रभाव पडून आपलेपणा निर्माण होतो. संयमाने, स्थितप्रज्ञ राहून ते समोरच्यांची मने जिंकतात. हे त्यांच्या स्वभावाचे व मानसिकतेचे वैशिष्ट्य आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गरिबीवर मात करून कर्तबगार व्यक्ती अशी स्वतःची ओळख निर्माण केली. स्वकर्तृत्वाने दोन वेळा खासदार होऊन लोकसभेत व मतदारसंघात उत्तम लोकप्रतिनिधी म्हणून नावलौकिक प्राप्त केला. त्याचप्रमाणे सामाजिक, शैक्षणिक, उद्योजकता अशा अनेक क्षेत्रांत यशोशिखरे गाठली. याचे श्रेय ते जन्मदात्या आईवडिलांना देतात तसेच थोर समाजसेवक जनार्दन भगत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले हे विनम्रतेने सांगतात.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांना अनेक थोरांचा सहवास लाभला. या थोर व्यक्तींच्या कार्याचा, समाजसेवेचा आदर्श घेऊन त्यांनी जीवनाची वाटचाल केली, तर काही थोर व्यक्तींचा प्रत्यक्ष सहवास लाभला व त्यांच्यासोबत कार्य करण्याचे भाग्यही त्यांना लाभले. विशेषकरून शेतकऱ्यांचे कैवारी लोकनेते दि. बा. पाटील आणि द्रष्टे नेते जनार्दन भगत यांच्यासोबत शेतकरी, प्रकल्पग्रस्तांच्या लढ्यासाठी कुरूक्षेत्रात लढण्याची संधी मिळाली हा त्यांच्या जीवनातील भाग्यशाली योग आहे.

उरण येथे १९८४ साली आंदोलनाचे सेनापती दि. बा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली लढलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनात अनेकांना भूमिगत राहावे लागले. यामध्ये या नेत्यांचेही धाडस, त्याग व योगदान मोठे आहे. हे नेते जंगलात होते तेव्हा त्यांचे खूप हाल झाले. उन्हापासून संरक्षण होण्यासाठी ते पालापाचोळा, मातीवर झोपले. पोलिसांचा जागता पहारा असल्यामुळे जेवणही मिळत नव्हते. अशा वेळी या भूमिगत नेत्यांनी कडू कारली उकडून ती खाऊन भूक क्षमविली. या त्यांच्या कार्याची नोंद शेतकरी आंदोलनाच्या इतिहासात सोनेरी अक्षरात लिहिली आहे. अशा या लोकनेत्यास वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

**–रामचंद्र म्हात्रे**, गोवठणे, उरण



# प्रेरणादायी 'रामपर्व'



पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात २६ मे रोजी कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वतीने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त 'एक कृतार्थ संध्याकाळ' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास साहित्य क्षेत्रातील दिग्गजांची उपस्थिती होती.

यावेळी 'कोमसाप'चे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, 'पानिपत'कार विश्वास पाटील, कवी, चित्रपट निर्माते, दिग्दर्शक रामदास फुटाणे, सुप्रसिद्ध ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर, 'कोमसाप' अध्यक्ष नमिता कीर, प्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे, प्रसिद्ध गझलकार ए.के. शेख, महापौर नितीन पाटील, नगरसेवक परेश ठाकूर, डॉ. प्रदीप ढवळ, प्रा. एल.बी. पाटील, 'कोमसाप' रायगड जिल्हा अध्यक्ष संजय गुंजाळ, नवीन पनवेल अध्यक्ष गणेश कोळी आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात उपस्थित साहित्यकारांची व प्रमुख पाहुण्यांची भाषणे झाली. त्यात सर्वांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकला. त्यांच्या संपूर्ण जीवनाविषयी व्हिडीओ क्लिपद्वारेसुद्धा माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाअंती 'रामपर्व' हे पुस्तक सर्व उपस्थितांना भेट देण्यात आले. हे पुस्तक मिळविण्यासाठी अक्षरशः झुंबड उडाली होती. सध्याच्या मोबाइलच्या युगात पुस्तक मिळविण्यासाठी उपस्थितांची एवढी धावपळ बघून फार बरे वाटले आणि मनाला विश्वास बसला की अजून वाचन संस्कृती जिवंत आहे. काही मिनिटांच्या आतच ५००पेक्षा जास्त प्रती खपल्या. मी हा क्षण डोळ्यांत टिपून घेतला, कारण एरव्ही पुस्तक प्रदर्शनात फारच कमी गर्दी बघायला मिळते.

वास्तविक कार्यक्रम संपल्यानंतर भोजनाची घोषणासुद्धा झाली होती, परंतु उपस्थितांनी पोटातल्या भुकेपेक्षा ज्ञानाच्या भुकेला प्राध्यान्य दिले हे पाहून खूप चांगले वाटले. कदाचित सर्वांनी विचार केला असेल पोटाची भूक नंतर मिटविता येईल, पण 'रामपर्व' मिळाले नाही, तर ज्ञानाच्या भुकेचे काय? जेवताना प्रत्येकाच्या एका हातात जेवणाची प्लेट आणि बगलेमध्ये 'रामपर्व' होते.

हे असे का झाले, तर 'रामपर्व' पुस्तकाचे आकर्षणच तसे होते. सुंदर मुखपृष्ठ, छान बायडिंग सर्वांनाच मोहित करणारे होते. तशीही मला पुस्तकाची खूप आवड आहे. घरी गेल्यावर सर्वप्रथम पुस्तक उघडल्यावर अत्यानंद झाला. पुस्तकातील कागद, छपाई, छायाचित्र आणि सुंदर, सोपी भाषा बघून मी 'रामपर्व'च्या प्रेमातच पडलो. असे झाले की केव्हा एकदाचे हे पुस्तक वाचतो.

'रामपर्व' या ग्रंथात एकूण १८ प्रकरणे आहेत आणि एकूण २२४ पानांचा हा ग्रंथ आहे. या ग्रंथाची सुरुवात बालपणापासून होऊन विश्वभ्रमंतीच्या सुवर्ण क्षणाने होते. जेव्हा आपण पहिले प्रकरण वाचायला घेतो तेव्हापासून जी पकड या पुस्तकाने घेतली ती शेवटच्या पानापर्यंत पकडून ठेवलेली आहे. जशी काही चित्रपटाची मांडणी केली असते तशी मांडणी या पुस्तकाचे लेखक विजय पवार यांनी केली आहे. जसा चित्रपटाचा एक क्षण झाला की पुढचा क्षण काय असेल याची जी उत्सुकता लागते ती उत्सुकता एक एक प्रकरण वाचल्यावर लागते. या 'रामपर्व'मध्ये जसा चित्रपटाचा नायक आपली भूमिका बजावतो व संघर्ष करतो अगदी तशीच आहे.

या ग्रंथात सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे लोकनेते रामशेठ ठाकूर यांची शिक्षणाची ओढ, जिद्द ही आहे. त्यांनी विपरीत स्थितीत शिक्षण घेतले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांचा खूप मोठा प्रभाव पडला आहे. त्यांनी कर्मवीर अण्णांचा शिक्षणाचा वसा पुढे नेला आहे आणि लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणाची कवाडे उघडी करून दिली आहेत. पुस्तकात शिक्षणाची जी शृंखला मांडली आहे ती अगदी पुढे नेलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा समतेचा वारसा महात्मा फुलेंनी चालविला, महात्मा फुलेंचा वारसा राजर्षी शाहू महाराजांनी चालविला, छत्रपती शाहूंचा वारसा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालविला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समतेचा वारसा कर्मवीर भाऊराव पाटील यांनी चालविला आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांचा वारसा लोकनेते रामशेठ ठाकूर चालवत आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर हे सुरुवातीला शिक्षक झाले आणि त्यांच्या जीवनात व्यावसायिक म्हणून कलाटणी मिळाली ती समाजसेवेच्या आवडीमुळेच. ज्या त्यांच्या बालपणीच्या व गावकऱ्यांच्या जीवन संघर्षाच्या समस्या होत्या त्या दूर करण्यासाठी या समाजसेवेमुळे ते व्यवसायाकडे वळले आणि मग ते शिक्षणमहर्षी झाले. त्यांनी शिक्षणाची कास कधीच सोडली नाही. म्हणूनच ते आज एवढे यशस्वी होऊ शकले.

'रामपर्व' हे केवळ पुस्तक नाही, तर ते जीवन जगण्याचे एक महान विद्यापीठ आहे. हा ग्रंथ विद्यार्थ्यांना घडविणारा आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर हे एक चालते बोलते विद्यापीठच आहे. विद्यार्थ्यांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांनी वाचावा असा 'रामपर्व' ग्रंथ आहे. हा ग्रंथ राजकारणी, समाजकारणी आणि आंदोलकांनासुद्धा मार्ग दाखविणारा आहे. वाटाघाटी कशा कराव्या, यशस्वी आंदोलने कशी करावी हे 'रामपर्व'मधून आपल्याला शिकायला मिळते.

'रामपर्व' हा ग्रंथ नक्कीच सर्वांनी वाचायला पाहिजे, विशेषकरून रायगड जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने. रायगडचा इतिहास, रायगड व पनवेल कसे घडले याचासुद्धा लेखाजोखा या ग्रंथात अगदी व्यवस्थितपणे मांडला आहे. त्यामुळे संपूर्ण रायगडच्या इतिहासाची माहिती होईल तसेच पनवेल हे शहर कसे आंतरराष्ट्रीय पटलावर आले याचीही आपल्याला माहिती मिळते. लेखक विजय पवार यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संपूर्ण जीवनाचा उलगडा केला आहे. येणाऱ्या पिढीसाठी एक महत्त्वपूर्ण दस्तावेज अगदी सोप्या भाषेत मांडला आहे.

'रामपर्व' ग्रंथ केवळ डोक्यावर घेऊन मिरवायचा, जयजयकार करण्यापुरता मर्यादित न ठेवता तो प्रत्येकाने डोक्यात उतरविण्याचा ग्रंथ आहे. हा एक अभ्यासू दस्तावेज आहे. हा ग्रंथ प्रत्येक वाचनालय, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे व मंदिरामध्ये संग्रही ठेवून त्याचे नियमित वाचन होणे गरजेचे आहे. एवढ्यापुरता हा ग्रंथ मर्यादित न ठेवता महामानव व समाजसुधारकांचा वसा पुढे नेणारा आहे, म्हणून या ग्रंथास शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात अंतर्भूत करायला काहीच हरकत नाही. कारण यामुळे विद्यार्थ्यांना एक नवीन दिशा व ऊर्जा मिळेल व तेही संघर्ष करून जीवनात नक्कीच यशस्वी होऊ शकतील. लोकनेते रामशेठ ठाकूर यांना चांगले आरोग्य लाभो व त्यांच्या हातून असेच मंगलकार्य घडो हीच त्यांच्या वाढदिवसानिमित्त मनोकामना!


**–अरविंद मोरे**, नवीन पनवेल



02 जून
माजी खासदार, लोकनेते
मा. श्री. रामशेठ ठाकूर
साहेब, आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
75 अमृत महोत्सवी वर्ष
TIPL
शुभेच्छुक
ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लि.
an ISO 9001-2015, ISO 14001-2015 & ISO 45001-2018 Certified Company
GROWING STRONG, BONDING STRONGER
Registered office : 1st floor, Om Sadnika, Plot No. 265/1, Panvel-Uran Road, Panvel, Navi Mumbai- 410206.
• Tel. : 022 27452713, 9769409120
• Email : thakurinfraprojects@gmail.com
• Web : www.thakurinfraprojects.in



माजी खासदार, लोकनेते
आदरणीय
श्री. रामशेठ ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!
75 अमृत महोत्सवी वर्ष
With best compliments from
NATIONAL OK TYRES
Authorised Dealer
BRIDGESTONE • MRF
• J K • TVS • MICHELIN
• FALKEN • GOODYEAR • CEAT
• MAXXIS • YOKOHAMA
Mumbai-Pune Road, Palaspa Phata,
Post. O.N.G.C., Panvel - 410221
Tel.: 7666266248 | Email ID: tyre_nok@rediffmail.com


02 जून
आमचे प्रेरणास्थान,
माजी खासदार,
लोकनेते...
श्री. आदरणीय
रामशेठ ठाकूर
साहेब,
आपणांस
अमृत महोत्सवी
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक : ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स कर्मचारी
सहकारी पतसंस्था, मर्यादित (पनवेल)
अरुण जनार्दन नाईक
शशिकांत मुंबईकर (माजी सचिव)
जगदिश हरिश्चंद्र घरत (अध्यक्ष)
संदीप सत्यवान आंग्रे (सचिव)
विवेक चिंतामण कोळी (खजिनदार)
संतोष तुकाराम कडू (उपाध्यक्ष)
आनंदकुमार लाल (संचालक)
शिरीष सुधाकर थवई (सहखजिनदार)
मुकेश हरि कडू (संचालक)
ध्रुवनाथ नामदेव कोळी (संचालक)
तुकाराम श्रवण वाघे (संचालक)
मनिषा खेमचंद जैन (सहसचिव)
रजनी सुशील पाटील (संचालिका)
रवींद्र नामदेव म्हात्रे



02 जून
अगणित माणसे या जगात जन्मास येतात,
पण तुमच्यासारखे यशस्वी व्यक्तिमत्त्व
एखादेच जन्मास येतं...
माजी खासदार
लोकनेते
मा. श्री.
रामशेठ ठाकूर
साहेब, आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!
75 अमृत महोत्सवी वर्ष
शुभेच्छुक
शंकर नागराणी
(उल्हासनगर)


75 अमृत महोत्सवी वर्ष
रायगड जिल्ह्यातील
दानशूर व्यक्तिमत्व...
लोकनेते
माजी खासदार
मा. श्री.
रामशेठ ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
निलेश दमडे



माजी खासदार,
लोकनेते
मा. श्री.
रामशेठ ठाकूर
02 जून
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
75 अमृत महोत्सवी वर्ष
शुभेच्छुक
दिनेश रविंद्र
खानावकर
नगरसेवक
पनवेल महानगरपालिका



रायगड जिल्ह्यातील
दानशूर व्यक्तिमत्व...
माजी खासदार,
लोकनेते
02 जून
मा. श्री.
रामशेठ ठाकूर
साहेब, आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!
75 अमृत महोत्सवी वर्ष
शुभेच्छुक
प्रकाश ठाकूर
वसंतराव नाईक कृषी भूषण
पुरस्कारप्राप्त (महाराष्ट्र शासन)
परीक्षित ठाकूर


लोकनेते
मा. खासदार
मा. श्री.
रामशेठ
ठाकूर
साहेब
आपणांस
वाढदिवसाच्या
लाख लाख
शुभेच्छा!
२ जून
श्री. प्रभूदास (आण्णा) भोईर
सचिव, एअरपोर्ट कामगार संघटना
जिल्हा अध्यक्ष, अखिल भारतीय कामगार
संघटना रायगड


राजकारणावर समाजकारणाची
मुद्रा उमटविणारे लोकनेते...
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन
माजी खासदार,
लोकनेते
मा.श्री.
रामशेठ
ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
जनार्दन भगत शिक्षण
प्रसारक संस्था,पनवेल
प्राचार्य डॉ. सिध्देश्वर तुकाराम गडदे
(सचिव, ज. भ. शि.प्र. सं.)
सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंद आणि विद्यार्थी


02 जून
रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स
कॉम्प्लेक्सचे संस्थापक
माजी खासदार लोकनेते
मा.श्री.
रामशेठ
ठाकूर
साहेब, आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स
व संचालक मंडळ, उलवे नोड, नवी मुंबई.
मा. श्री. आमदार प्रशांत रामशेठ ठाकूर
(अध्यक्ष)
मा. श्री. परेश रामशेठ ठाकूर
(चेअरमन अँड मॅनेजिंग डायरेक्टर)
मा. श्री. यशवंत त्रिंबक देशमुख
(जनरल सेक्रेटरी )
सदस्य : श्री. रविंद्र बाळकृष्ण भगत, श्री. भार्गव रामदास ठाकूर, श्री. मनोहर लक्ष्मण ओवळेकर, श्री. शिव शंकर सुमन, श्री. स्वप्निल अरुण ठाकूर, श्री. प्रतिक भरत ठाकूर, श्री. अभिजित उत्तमराव जाधव, श्री. अमोल यशवंत देशमुख, श्री. भुषण श्रीधर ठाकूर


02 जून
माजी खासदार, लोकनेते
मा.श्री.
रामशेठ
ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी
दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
मेसर्स बी. आर. ठाकूर गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
प्रोप्रायटर : श्री. भार्गव रामदास ठाकूर
कोपर – गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. ऑफीस दूरध्वनी क्र.९९३०४०७७४६


माजी खासदार, लोकनेते
मा.श्री.
रामशेठ
ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
S. N. KOKITKAR (B.E.Civil)
DIRECTOR
Mob. : + 91 9223281560
FINETECH
Construction Co.
Engineers • Builders • Developers
Gurudatta Height, Shop No. 5, Near Water Tank, Sunil Nagar, Dombivli (E) 421 201/
Tel. : 0251-2886501 Mob.: 9869006501 • Email : Finetech7469@gmail.com